
# श्री
# मद्
# भग
# वद्
# गीता



## मराठी
## श्लोक
## रूप

**किशोर**
**कुलकर्णी**

ई साहित्य प्रतिष्ठान

# मराठी श्लोकरूपी संपूर्ण श्रीमद्भगवद्गीता

## लेखक : किशोर कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

# मराठी श्लोकरूपी संपूर्ण श्रीमद्भगवद्गीता


## अनुवादक: किशोर कुलकर्णी

अ-३०१, दीप्ति ग्रीन्स, बॉम्बे  कॅम्ब्रिज स्कूल समोर, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९९

फ़ोन: 88280 89461

**kishorkulkarni@hotmail.com**

Blog: https://kishorkulkarni.wordpress.com


सर्व हक्क स्वाधीन. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या परवानगीशिवाय प्रकाशित करू नये किंवा त्याची नक्कल करून वितरण करू नये.


प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com


esahity@gmail.com

प्रकाशन : ९ ऑक्टोबर २०२१ अश्विन शुद्ध ४ शके १९४३



©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# अल्प परिचय

लेखक एका सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबात एका छोट्या शहरात जन्मला व वाढला. परंपरागत रूढी व धर्माचरण यानुसार जीवन जगणारे कुटुंब व त्यामुळे एक प्रकारे देवभीरु स्वभाव नैसर्गिकपणेच बनलेला. पण पुढे अभियांत्रिकी पदवीसाठी मुंबईतील एक प्रथितयश संस्थेत पांच वर्षे वसतिगृहात राहाणे व नंतर नोकरीनिमित्त निरनिराळ्या शहरात व अठरापगड जातीधर्मांच्या व पार्श्वभूमीच्या लोकांमध्ये वावरल्यामुळे व्यक्तिमत्त्वात बदल होत गेला. पूर्वीचा धार्मिक व देवभीरु स्वभाव कमी होऊन, अधिकाधिक शास्त्रीय व तार्किक दृष्टिकोण बनला.

पुढे एकदा सिंगापूरमध्ये कामनिमित्त तीन महिने वास्तव्य करावे लागले. लेखकाचा भाऊ तिथेच स्थायिक असल्याने त्याच्या घरीच राहणे झाले. त्यादरम्यान भावाच्या गुरूंची योगायोगाने भेट घडून आली आणि तेव्हांपासून अध्यात्मात रस वाढू लागला. मग नोकरी लवकरच, म्हणजे वयाच्या ५३ व्या वर्षीच सोडून अध्यात्माची कास धरली. ज्ञानेश्वरीचे अनेकवार वाचन व मनन झाले. ज्ञानेश्वरीचे इंग्रजीत भाषांतर करून ते ब्लॉगच्या स्वरूपात "स्पीकिंग ट्री" या टाइम्स ऑफ इंडियाच्या वेबसाइटवर पोस्ट केले. तसेच त्याच साइटवर इतर आध्यात्मिक चिंतनाच्या स्वरूपातील कित्येक ब्लॉग पण पोस्ट केले. टाइम्स ऑफ इंडियाच्या दैनिकात संपादकीय पानावर "स्पीकिंग ट्री" नांवाच्या आध्यात्मिक कॉलममध्ये वीसच्या वर लेख सुद्धा छापून आले. मग लेखकाने त्याच्या आध्यात्मिक चिंतनाच्या ब्लॉगचे पुस्तकरूपाने स्वप्रकाशन केले. तसेच ज्ञानेश्वरीचे इंग्रजी भाषांतर सुद्धा स्वप्रकाशित केले. गीतेचे ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जे मनन चिंतन झाले, त्या आधारावर लेखकाला समजलेले गीतेचे सार प्रथम इंग्रजीतून व त्यानंतर मराठीतून स्वप्रकाशित केले.

लेखकाला त्याच्या सद्गुरूंकडून रीतसर शक्तिपाताची दीक्षा लाभलेली आहे आणि सद्गुरु कृपेनेचे अध्यात्ममार्गावर वाटचाल सुरु आहे.

# लेखकाची इतर प्रकाशने

1) Do Not Take This World Seriously! (2 volumes)
2) Spiritual Musings of An Ordinary Seeker
3) Shri Dnyaneshwari (English translation in 3 volumes)
4) Practical Insight Into Bhagawad Gita
5) Bhagawad Geeta - Distilled Philosophy
6) गीतासार - मला भावले रुचलेले
7) भगवद्गीता - निवडक श्लोकांचे सार
8) हे जग गंभीरपणे घेऊ नका - भाग १ (आध्यात्मिक संकल्पना)
9) हे जग गंभीरपणे घेऊ नका - भाग २ (आध्यात्मिक जीवनपद्धति)
10) English Abhangwani
11) Shrimad Bhagavad Geeta as I understand it (3 volumes)
12) श्रीमद्भगवद्गीता जशी मला समजली (३ भाग)

**ही सर्व पुस्तके ईबुक व प्रिंट स्वरूपात अमेझॉनवर आणि प्रिंट स्वरूपात पोथी डॉट कॉम वर उपलब्ध आहेत.**

# प्रस्तावना

श्रीमद्भगवद्गीता (किंवा नुसतीच गीता) म्हणजे भारतीय शास्त्रग्रंथांमधील एक सर्वात पूजनीय व सन्मान्य असा ग्रंथ आहे, ज्यात भारतीय सनातन आध्यात्मिक परंपरेचे सर्वोच्च तत्त्वज्ञान सर्वंकषपणे मांडलेले आहे. असे मानले जाते की गीता ही प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला कुरुक्षेत्रावर महाभारत युद्धाआधी सांगितली. कौरव व पांडवांमधील युद्ध सुरु होणार असतांनाच, अचानक अर्जुनाला मोहाने ग्रासले व कौरवसैन्यातील आपल्याच वडीलधारी माणसांना, गुरुजनांना, इतर आप्तवकीयांना आपण मारायला निघालो आहोत हे योग्य नव्हे असे त्याला वाटले. त्यामुळे त्याने आपली शस्त्रे खाली ठेवली आणि अत्यंत विषादपूर्ण अवस्थेत तो रथात खाली बसला. त्याने श्रीकृष्णांना आपल्या स्थितीचे समर्थन देण्याचा प्रयत्न केला, पण श्रीकृष्णांना ते अजिबात पटले नव्हते, हे जेव्हां अर्जुनाच्या लक्षात आले, तेव्हां त्याने श्रीकृष्णांना विनंति केली की त्यांनीच मित्र व हितचिंतक या नात्याने अर्जुनाला मार्ग दाखवावा. श्रीकृष्णांनी प्रथम थोडक्यात सनातन तत्त्वज्ञान समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण तरी अर्जुनाचे मन वळत नव्हते हे पाहून मग श्रीकृष्णांनी सविस्तरपणे सर्व गूढ आध्यात्मिक तत्त्वज्ञान उपनिषदांच्या साररूपात अर्जुनापुढे उकलले, जे श्रीमद्भगवद्गीता म्हणून सर्वच जगाला पुढे उपलब्ध झाले. श्रीकृष्णांकडून अशा प्रकारे गुरूपदेशच अर्जुनाला प्राप्त झाला आणि मग त्याचा आधीचा मोह सर्वस्वी नष्ट होऊन अर्जुन युद्धाचे प्राप्त कर्म करण्यास तयार झाला.

लेखकाने संपूर्ण भगवद्गीतेतील सर्व श्लोकांचे मराठी रूपांतर करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. कित्येक मराठी भाषिक लोकांना गीतेचे नित्य पठण करण्याची इच्छा असेल, परंतु मूळ संस्कृत गीतेचे पठण त्यांना जड जात असेल. शिवाय जरी संस्कृत गीतेचे पठण केले, तरी त्यातील अर्थ भाषेच्या अडचणीमुळे सहजासहजी जाणीवेत प्रतीत होणार नाही. तेव्हां त्यांच्यासाठी मराठी श्लोकरूप गीता उपलब्ध करून द्यावी या उद्देशाने हा पुस्तकप्रपंच लेखकाने केला. याचे पठण वेळ असल्यास रोज संपूर्ण किंवा जेवढे जमेल तेवढे करता येईल. असे पठण करत असतांना गीतेतील तत्त्वज्ञानाची उजळणी नित्यनेमाने होत राहून आपली मानसिकता बदलण्याचा हेतु अधिक चांगल्या प्रकारे साध्य होईल.

*** **** ***

# सद्गुरुचरणी संपूर्ण आदरभावनेने समर्पित

सद्गुरु व समस्त सद्गुरुपरंपरा यांच्याच कृपेने
मी अध्यात्ममार्गावर येऊन वाटचाल करू शकत आहे.

# ॥ अध्याय १ ॥

संजयासी म्हणे धृतराष्ट्र । धर्मक्षेत्र असे जे कुरुक्षेत्र ॥
तेथे कौरव पांडव जमले । युद्धासाठी, काय केले? ॥१:१॥
संजय मग म्हणे धृतराष्ट्राला । शत्रूव्यूह दुर्योधनाने पाहिला ॥
मग द्रोणाचार्यांपाशी गेला । आणि त्यासी असे म्हणाला ॥१:२॥

आचार्य, पहा ही पांडवसेना। धृष्टद्युम्नाने केली ती रचना॥
जो द्रुपदाचा पुत्र बुद्धिमान॥ आपुलाच शिष्य कीर्तिमान॥१:३॥

पाहा, त्यांच्यात हे योद्धे महान। युयुधान, विराट, द्रुपदसमान॥
बलवान व निपुण धनुष्यधारी। ज्यांची भीमार्जुनाशी बरोबरी॥१:४॥

धृष्टकेतु व चेकितान। पुरुजित हे वीर्यवान॥
शैब्य व कुंतिभोज। नरश्रेष्ठात काशीराज॥१:५॥

युधामन्यु, उत्तमौजा वीर । अभिमन्यु सुभद्रेचा सुपुत्र ॥
तसेच द्रौपदीचे पुत्र शूर । हे असती महारथी धीर ॥१:६॥

माझ्या सेनेतही असती । कित्येक उत्तम सेनापति ॥
त्यांची नांवे सांगतो श्रेष्ठ । करावे श्रवण, हे द्विजश्रेष्ठ ॥१:७॥

भीष्माचार्य व स्वयं आपण । कृपाचार्य तसा विजयी कर्ण ॥
अश्वत्थामा आणि सौमदत्त । तसेच विकर्ण आदि समस्त ॥१:८॥

आणखी कित्येक वीर असती । लाविले प्राण पणा मजसाठी ॥
ते धारण करिती शस्त्रे समस्त । आणि युद्धविद्येत अतिनिष्णात ॥ १:९॥
भीष्मांनी रक्षिली जी सेना । असे  आपुली मर्यादेविना ॥
परि पांडवाची सेना थिटी । जरी भीम तिचा सेनापति ॥१:१०॥
आपण सर्वांनी घ्यावे स्थान । आप आपुले जे दिले नेमून ॥
व करावे भीष्मांचे रक्षण । तसेच स्वत:सीही वाचवून ॥१:११॥

केली गर्जना सिंहाजैसी । आणि वाजविले शंखासी ॥
भीष्मांनी, जे कौरवज्येष्ठ । मग झाला दुर्योधन हर्षित ॥१:१२॥

मग किती रणवाद्ये, जसे शंख । नौबदी, डंके, मृदुंग व गोमुख ॥
योद्ध्यांनी वाजविली अनेक । उत्पन्न झाला नाद भयानक ॥१:१३॥

ज्यासी जोडले अश्व श्वेत । कृष्ण अर्जुन बैसले रथात ॥
शंख असती दिव्य त्यांचे । त्यांनी नाद केले त्यांचे ॥१:१४॥

पांचजन्य शंख श्रीकृष्णांचा । तर देवदत्त असे अर्जुनाचा ॥
अचाट कृत्ये करी जो भीम । त्याचा शंख पौन्ड्र ते नाम ॥१:१५॥
अनंतविजय कुंतीपुत्र युधिष्ठिराचा । सुघोष शंख माद्रीपुत्र नकुलाचा॥
आणि सहदेव सहोदर त्याचा । नाद करी मणिपुष्पक शंखाचा ॥१:१६॥
काशीराज धनुर्धारी बलवान । शिखंडी तो रथी महान ॥
धृष्टद्युम्न व विराट । सात्यकी अविजित ॥१:१७॥

वीर अभिमन्यु सौभद्र। पराक्रमी व द्रौपदीपुत्र॥
आणि महाराज द्रुपद। त्यांचे शंख अनेकविध॥१:१८॥

त्यांचा नाद अति कर्कश। त्याने व्यापिले आकाश॥
दुमदुमली पृथ्वी समस्त। ऐकोनी कौरव व्यथित॥१:१९॥

ध्वजस्तंभावर हनुमान। असे ज्याच्या तो अर्जुन॥
त्याने उचलिले धनुष्यास। पाहूनी युद्धसिद्ध कौरवास॥१:२०॥

श्रीकृष्णासी म्हणे पार्थ । हे अच्युता, ने माझा रथ ॥
दोन्ही सैन्यांच्या मध्यात । संजय धृतराष्ट्रासी सांगत ॥१:२१॥
योद्धे इथे जमले कित्येक । युद्धासाठी असती उत्सुक ॥
मी घेईन त्याचा अंदाज । माझी इच्छा ही सहज ॥१:२२॥
दुर्योधन अधर्मी असत । त्यासी करण्या मदत ॥
हे जमले रणांगणात । त्यांस पाहू म्हणे पार्थ ॥१:२३॥

असे बोलता पार्थ । कृष्णाने उत्तम रथ ॥
उभा केला नेऊन । सैन्यांमध्ये दोन ॥१:२४॥

कृष्ण म्हणे पार्थासी । पाहा या कौरवांसी ॥
भीष्म व द्रोण असती । व इतरही नराधिपति ॥१:२५॥

तेव्हां पाहात असे पार्थ । गुरुजन, पुत्र, कुलज्येष्ठ ॥
पौत्र व बंधू तसेच मित्र । आदि उभे धरून शस्त्र ॥१:२६, २७॥

त्या प्रियजनांसी समस्त । पाहूनी खिन्न होई पार्थ ॥
आणि अनुकंपा वाटता । तो झाला असे बोलता ॥१:२८॥
सुटला कंप दाह शरीरास । उभे झाले ताठ माझे केस ॥
न गात्रात किंचित शक्ति । मुखास पडला शोष अति ॥१:२९॥
गांडीव न राही हातात । त्वचा जणू असे जळत ॥
मी न उभा राहू शकत । मन माझे अतिभ्रमित ॥१:३०॥

घडेल कांही विपरीत। असे माझे मन सांगत॥
वध करोनी स्वजनांचा। न होईन धनी श्रेयाचा॥१:३१॥
नसे मज कांक्षा विजयाची। राज्यभोगाची वा सुखाची॥
काय हेतु असे राज्यसुखाचा। हे कृष्णा, भोग वा जीवनाचा॥१:३२॥
जेव्हां उभे सामोरे युद्धासाठी। तेच, ही कांक्षा ज्यांच्यासाठी॥
राज्यभोगाची, सुखोपभोगाची। त्यांनी सोडिली भ्रांती जीवाची॥१:३३॥

यात आचार्य, पितर। आणि पितामह, पुत्र ॥
तसेच मातुल, श्वशुर। मेहुणे, संबंधी, पौत्र ॥१:३४॥

ते करितील माझा वध जरी। मी न इच्छी त्यांचा वध तरी ॥
नसे मातबरी मजला राज्याची। त्रैलोक्याच्या वा पृथ्वीराज्याची ॥१:३५॥

आम्हांसी सुख न वाटावे। धृतराष्ट्रपुत्र जरी वधावे ॥
ते आततायी, पाप तरी। आम्हांस लागेल, हे हरी ॥१:३६॥

कौरव आमचेच बंधू । त्यांसी मी कसे वधू? ॥
काय सुख आम्हांसी । मी मारता आप्तांसी ॥१:३७॥

त्यांचे चित्त लोभावले । कौरवांसी दोष न कळे ॥
कुलक्षय मित्रद्रोह करता । होईल पातक अजाणता ॥१:३८॥

पण आम्ही जाणत असता । लागे दोष कुलक्षय करता ॥
मग ते टाळावे, हे माधवा । हा विचार आम्ही करावा ॥१:३९॥

जेव्हां होईल नाश कुलाचा। होईल नाश कुलधर्माचा॥
कुलधर्म होता नष्ट। कुळ होईल धर्मभ्रष्ट॥१:४०॥
हे कृष्णा, दुर्गुण बळावती। कुलस्त्रियात पसरे अनीति॥
दुष्ट स्त्रिया मग प्रसविती। अयोग्य व दुर्गुणी संतती॥१:४१॥
कारणीभूत अयोग्य संतती अशी। देण्या नरक कुलासी व स्वत:सी॥
होता लुप्त समस्त विधी पिंडदान। मग त्यांच्या पितरांचे होई पतन॥१:४२॥

कुळाचा नाश हे दोष करिती । मग जन्मा येई अयोग्य संतति ॥
जातीधर्म कुलधर्म नष्ट होती । जे सनातन परंपरागत असती ॥ १:४३॥

जे करिती कुलधर्माचा नाश । त्यांना दीर्घकाळ नरकवास ॥
असे हे जनार्दन, मी ऐकिले । विद्वज्जनांनी जे सांगितले ॥१:४४॥

स्वजनांसी वधणे हे वाईट । तरी ते पाप करण्या उद्युक्त ॥
झालो आहो आम्ही लोभाने । केवळ राज्यसुखोपभोगेच्छेने ॥१:४५॥

तेव्हां न धरावे हाती शस्त्र । वधितील जरी मज धृतराष्ट्रपुत्र ॥
मी न करीन प्रतिकार किंचित । ते अधिक योग्य असे माझे मत ॥१:४६॥

मग संजय सांगे, असे बोलून । अर्जुनाने टाकिले धनुष्यबाण ॥
बैसला रथात रणी शोकमग्न । होई अति विषण्ण त्याचे मन ॥१:४७॥

** अध्याय १ समाप्त **

## ॥ अध्याय २ ॥

पार्थाचे मन झाले दयार्द्र । त्याचे मनी विषाद तीव्र ॥
त्याचे नयनी अश्रू दाटले । हे पाहात हरी मग बोले ॥२:१॥
या संकटसमयी, हे अर्जुना । हा भ्रम कोठून झाला मना ॥
अनार्य लोक असे करिती । न स्वर्ग, मिळेल अपकीर्ति ॥२:२॥

हा भ्याडपणा सोड, पार्था । तो न शोभे तुजला सर्वथा ॥

नसावे तुझे मन हे दुर्बळ । तू असससी शत्रूचा काळ ॥२:३॥

अर्जुन म्हणे, हे मधुसूदन । सांग कसे करू शरसंधान ॥

वधू रणांगणी भीष्मद्रोणा । जे असती पूजनीय, कृष्णा ॥२:४॥

न मारावे महानुभावा गुरूंस । भिक्षाही मागावी त्यापरीस ॥

त्यांसी वधून जे सुख मिळेल । या लोकी ते रक्तरंजित असेल ॥२:५॥

दोहोत अधिक श्रेयस्कर काय । कोणाचा होईल युद्धात विजय ॥
जरी हे कौरव आतुर युद्धासी । जगणे काय हेतु वधून त्यांसी ॥२:६॥
अज्ञानाने असे माझे मन भ्रांत । कर्तव्य माझे मजसीच अज्ञात ॥
मी आपला शिष्य  शरणागत । तरी सांगावे माझे हित कशात ॥२:७॥
पृथ्वीचे राज्य निष्कंटक लाभेल । स्वर्गी इंद्रपदाचा लाभ होईल ॥
परी हा शोक इंद्रियांसी सुकवीत । कसा व्हावा दूर न कळे किंचित ॥२:८॥

संजय सांगे धृतराष्ट्रास । असे बोलून श्रीकृष्णास ॥
म्हणे मी युद्ध न करीन । व बसला स्वस्थ अर्जुन ॥२:९॥

मग हसले किंचित हृषीकेश । असे बोलते झाले अर्जुनास ॥
जो मध्ये सैन्यांच्या दोन । बैसला शोकाकुल होऊन ॥२:१०॥

जे नसे योग्य शोक कराया । तयाचा शोक करिसी वाया ॥
न जाणता, बोलसी जेवी विद्वान । अशोचनीय मरण जनन ॥२:११॥

नष्ट न होऊ कधी तू किंवा मी । न सर्व राजे, महाराजे, असामी ॥
जीवन हे अविनाशी, अविरत । नसे याचा आदि, वा अंत ॥२:१२॥

एकचि देह, अवस्थांचे नानात्व । कौमार्य, तारुण्य आणि वृद्धत्व ॥
आत्मा एक, अनेक देह नानापरी । पडे एक जरी, तरी दुसरा धरी ॥२:१३॥

इंद्रियानुभव नश्वर असती । जसे येती तसे विरून जाती ॥
त्यांसी मिथ्या, भ्रामक मानावे । म्हणून त्यांसी सहन करावे ॥२:१४॥

ज्यासी सुखदुःख समान । आणि जो असे धैर्यवान ॥
तो न भिये विषयसंबंधा । ते न करू शके तया बाधा ॥२:१५ ॥

जे भ्रामक, ते नाशी । जे सत्य, ते अविनाशी ॥
ज्ञानी हे जाणे सर्वथा । नसे त्यासी प्रपंच अन्यथा ॥२:१६॥

समस्त वस्तुमात्र या जगतात । असे एकमात्र चैतन्यजात ॥
ते असे चिरंतन, शाश्वत । कोणी करू न शके त्यास नष्ट ॥२:१७॥

आत्मा अविनाशी, अमाप, शाश्वत । शरीर त्याने धारिले नाशवंत ॥

म्हणून तू करावे युद्ध, हे अर्जुना । शरीर पडावयाचे कधी तरी ना ॥२:१८॥

आत्मा न मरे, मारे ही न । जे विपरीत माने ते अज्ञान ॥

कोणी न मारू शके आत्म्यासी । न ही आत्मा मारी कोणासी ॥२:१९॥

न जन्मे, न मरे हा आत्मा । तो असे अमर व अजन्मा ॥

तो तर चिरंतन, अविनाशी । जरी काळ ग्रासे शरीरासी ॥ २:२०॥

अविनाशी, चिरंतन आत्मा । असे अविकारी व अजन्मा ॥

हे जो जाणे सर्वथा । न मारे त्यासी वृथा ॥२:२१॥

होता जीर्ण वस्त्र त्यजावे । आपण घ्यावे सुंदर नवे ॥

वृद्ध शरीरासी आत्मा त्यजे । आणि धारी नवीन ताजे ॥२:२२॥

आत्म्यासी शस्त्र तोडी न शके । ना त्यासी अग्नि जाळू शके ॥

त्याला न पाणी भिजवे । न ही वारा सुकवे ॥२:२३॥

आत्मा कदापि न तुटे, न जळे । न भिजे, न वाऱ्याने वाळे ॥
अविनाशी, सर्व त्याने व्याप्त । स्थिर, अचल आणि समयातीत ॥२:२४॥

आत्मा अव्यक्त, विचारातीत । अविकारी, असे म्हणतात ॥
आत्मा असा जाणावा । मग शोक का करावा? ॥२:२५॥

जन्ममृत्यूचे निरंतर चाक । आत्मा असे भ्रमत अथक ॥
धारणा तुझी असे पार्थ । तरी न करावा शोक व्यर्थ ॥२:२६॥

जो जन्मे तो मृत्यु पावे खचित। तोचि पुन्हा जन्मे मृत्युपश्चात ॥
हे असे अटळ जाण मनुष्या। मग का शोक करावा वाया ॥२:२७॥

जन्माआधी प्राणिमात्र नसती। जगती कांही काळ या जगती ॥
मृत्यूपश्चात फिरुनी नसती। मग वाया शोक का करिती? ॥२:२८॥

आत्मस्वरूप एक आश्चर्य। कोणी पाही यात आश्चर्य ॥
याचे आश्चर्य कोणी वर्णी। ऐकी, तरी कोणी न जाणी ॥२:२९ ॥

देहात आत्मा सर्वव्यापी । जो न पावे वध कदापि ॥

मग का करावा शोक । कोणाहीसाठी नाहक? ॥२:३० ॥

वेळोवेळीचे प्राप्त कर्म ॥ ते करणे हा स्वधर्म ॥

स्वधर्म क्षत्रियाचा लढणे । युद्धप्रसंग न टाळणे ॥२:३१ ॥

हा युद्धप्रसंग तुजसमोर ठाकला । स्वर्गाचा दरवाजा जणू उघडला ॥

ते क्षत्रिय भाग्यशाली असती । लाभे असे युद्ध, जे देई वीरगति ॥२:३२॥

हे धर्मयुद्ध जरी तू टाळिसी । इहलोकीची कीर्ति गमाविसी ॥
मुक्तीचे साधन स्वधर्म होता नष्ट । जोडशील जघन्य पाप दुष्ट ॥२:३३॥

तू रणांगण सोडशील । लोक तुजला निंदितील ॥
मरणाहुनी क्लेशकारक । सज्जनास अपकीर्ति अधिक ॥२:३४॥

जरी तू रणांगण सोडूनी जाशी । महारथी म्हणती भ्याड तुजसी ॥
आता जो तू बहुमान्य असशी । तो मान मग नाहक गमाविशी ॥ २:३५ ॥

शत्रु बोलतील तुला घालूनपाडून। करतील चेष्टा टोचून टोचून॥
अपशब्द तुला बोलतील दाहक। हे तुजसाठी अति दु:खकारक॥२:३६॥
पावशील युद्धात वीरगति। होईल तुजला स्वर्गप्राप्ति॥
कर हे युद्ध होऊनी निश्चयी। भोग राज्य होऊनी विजयी॥२:३७॥
सुख, दु:ख, लाभ, नुकसान। जय, पराजय सर्व समान॥
हो तयार युद्धास ऐसे मानुनी। कदापि न होसी पापाचा धनी॥२:३८॥

इथवर सांगितले सांख्ययोग तत्त्व। मननचिंतनाला ज्यात असे महत्त्व॥

कर्मयोग काय ते आता तुज सांगेन। होय कर्मबंधमुक्ति, करिता अनुसरण ॥२:३९॥

कर्म केले ते वाया न जाय। जरी ते पूर्णत्वासी न जाय ॥

जे घडे, जसे घडे, ते असे योग्य। पाळिता हा धर्म नष्ट होई भय ॥२:४०॥

परमेश्वरप्राप्ति हे असे ज्याचे ध्येय। त्याच्या बुद्धीचा असे दृढ निश्चय ॥

पण ऐहिक सुखप्राप्ति ज्यासी प्रिय। बुद्धीचा त्याच्या नसे कदापि निश्चय ॥२:४१॥

वेदांतील कर्मकांड सुखासाठी। जिवंतपणी तसेच मृत्युपाठी ॥
म्हणून लोक वेदाभ्यास करिती। फळासाठी कर्म सर्वस्व मानिती ॥२:४२॥
ज्यांसी होय कामना सुखाची। इहलोकी आणि परलोकीची ॥
वेदविदित कर्मकांड अनुसरिती। जन्ममृत्यूच्या चक्रात अडकती ॥२:४३॥
जे विषयसुखापाठी धावती। धनसंपत्तीची लालसा धरिती ॥
ते भ्रामक बोलांनी मोहिती। समाधिसुखाते ते न जाणती ॥२:४४॥

वेद असती त्रिगुणांवर आधारित। मात्र अर्जुना, तू असावे गुणातीत॥
द्वैत नसावे, नसावी भ्रांत पोटाची। कास धरावी सत्य स्वस्वरूपाची॥२:४५॥
जे हेतुपूर्ति अल्प पाण्यात सायासे। तेचि विशाल जलाशयी अनायासे॥
जे होई प्राप्त धरिता कास वेदांची। ओळखिता स्वस्वरूप मिळे तेचि॥२:४६॥
तू करावे कर्मची केवळ। तुझे हाती नसे कर्मफळ॥
नसावा मनी फळाचा हेतु। कर्माविषयी नसावा किंतु॥२:४७॥

मोह त्यागुनी कर्म करावे। लक्ष परमेश्वरावरी असावे॥
कर्म पूर्ण होवो वा अपूर्ण। एकचि भाव हा योग जाण॥२:४८॥
फलाशासहित कर्म असे निकृष्ट। फलाशाविरहित कर्म उत्कृष्ट॥
कर्म करिता स्मरावे परमेश्वराते। ते जन दरिद्री जे इच्छिती फळाते॥२:४९॥
राखी अनुसंधान ईश्वराचे। तुटे बंधन कर्मफलाचे॥
म्हणोनी स्थितप्रज्ञ व्हावे। ईशचरणी कर्म अर्पावे॥२:५०॥

मनुष्य होई स्थितप्रज्ञ जेव्हां । लाभे त्यासी ब्रह्मज्ञान तेव्हां ॥
करोनी फलत्याग तोडी कर्मबंध । मिळवी परमपदाचा ब्रह्मानंद ॥२:५१॥

निर्मोही जेव्हां तू होशील । सृष्टिभ्रमासी त्यागिशील ॥
आधीचा तू ऐहिक ज्ञानलिप्त । मग होशील सर्वस्वी अलिप्त ॥२:५२॥

वेदविधाने भिन्नभिन्न असती । तव बुद्धीसी वाया भ्रमविती ॥
होई बुद्धि स्थिर स्वस्वरूपी । योगी तदाकार मज रूपी ॥२:५३॥

अर्जुन मग प्रश्न विचारी केशवासी । स्थितप्रज्ञाची बोली वागणूक कैसी? ॥
तो दिसे कैसा, कैसा असे? । त्यासी जन बोलाविती कैसे? ॥२:५४॥

भगवान म्हणती, बा अर्जुना । त्यागी जो सकळ वासना ॥
चित्ती निरंतर समाधान ज्यासी । म्हणावे स्थितप्रज्ञ त्यासी ॥२:५५॥

जयाचे मन दु:ख होता न त्रासे । ज्यासी सुखाची कामना नसे ॥
त्यागिले कामक्रोधादि रिपूसी । स्थितप्रज्ञ म्हणावे तयासी ॥२:५६॥

आनंद नाही शुभप्राप्त होता। की क्लेश नसे अशुभ घटता॥
वस्तूंचा नसे मोह ज्यासी। स्थितप्रज्ञ म्हणावे त्यासी॥२:५७॥
कासव घेई अवयव आत ओढूनी। तेवी जो घेई ज्ञानेंद्रिये खेचूनी॥
न देई मान कदापि विषयासी। स्थितप्रज्ञ म्हणावे तयासी॥२:५८॥
विषयेंद्रियावरी ताबा मिळे। परि विषयरस न निवळे॥
जेव्हां होय दर्शन परमतत्त्वाचे। तेव्हां नष्ट होती रस विषयांचे॥ २:५९॥

कितीही असो मनुष्य विद्वान । करो इंद्रियनिग्रहाचे प्रयत्न ॥
तरी ही इंद्रिये दाद न देती । हे कौन्तेया, मना लोभविती ॥२:६०॥

इंद्रियांवरी कठोर ताबा ठेवी । मन मजवरी सदा दृढ ठेवी ॥
ज्याची इंद्रिये मानिती जयासी । म्हणावे स्थितप्रज्ञ तयासी ॥२:६१॥

विषयांचा करी विचार जरी । त्यांची वासना निपजे तरी ॥
वासनेतून उगम तीव्र लालसेचा । पूर्ती न होय तव उपज क्रोधाचा ॥२:६२॥

क्रोध प्रसवे अविवेकाते । जो विभ्रमवे स्मृतीते ॥

मग नसे दूर बुद्धिनाश । शेवटी होई सर्वनाश ॥२:६३॥

आवडीनावडी सर्व त्यागिल्या असती । इंद्रिये त्याच्या नियंत्रणात असती ॥

मग जरी त्यासी विषयानुभव मिळे । तयाचे मन त्याने कदापि न मळे ॥२:६४॥

ज्याचे मन शांति पावे अचळ । त्याचे दु:ख नष्ट होई सकळ ॥

मग त्याची बुद्धि होई स्थिर । त्याच्या आत्मस्वरूपी सत्वर ॥२:६५॥

आत्मज्ञानाचा गंध नसे। मन सदैव चंचल असे॥
त्यासी शांति कदापि नसे। मिळावे सुख त्यासी कसे? ॥२:६६॥
मन जयाचे इंद्रियांकडे आकृष्ट। तयाची बुद्धि होय मार्गभ्रष्ट॥
चक्रीवादळात महासागरी। जशी नाव बुडे बिचारी॥२:६७॥
जो ठेवी ताब्यात इंद्रियासी। आणि दूर ठेवी विषयासी॥
त्याची बुद्धि, बा अर्जुना। धरोनी रही आत्मज्ञाना॥२:६८॥

आत्मज्ञानी रातांधार बहुजनासी । त्यात असे दिनप्रकाश योग्यासी ॥
ऐहिकात जागृत सामान्यजन । त्यात मात्र निद्रिस्त योगीजन ॥२:६९॥

नद्यांचे जल सदैव येई सागरी । तो आपुली मर्यादा न सोडी तरी ॥
शांत जो उदासीन वासनाप्रति । वासना ज्यासी न त्यासी शांति ॥२:७०॥

सोडोनी वासना समस्त । व्हावे सर्वस्वी वासनारहित ॥
"मी, माझे" द्वैत त्यागावे । शांति, ब्रह्मानंद मिळवावे ॥२:७१॥

या स्थितीसी म्हणावे ब्राह्मी । जीत मनुष्य असे निर्मोही ॥
या स्थितीत मरण येई । ब्रह्म त्यासी प्राप्त होई ॥२:७२॥

**अध्याय २ समाप्त**

# ॥ अध्याय ३ ॥

म्हणे अर्जुन जनार्दनासी । मानिसी सरस बुद्धियोगासी ॥
का म्हणसी मजसी युद्ध कर । जरी ते कर्म विनाशकारी घोर ॥३:१॥
कधी एक कधी दुजे सांगसी । का द्विधा माझे मन करिसी ॥
सांग मार्ग सुस्पष्ट एकचि । असेल शाश्वती हिताची ॥३:२॥

पापरहित अर्जुना, म्हणती भगवंत। प्राचीन मुक्तिमार्ग दोन कथित॥
ज्ञानमार्ग असे सांख्यांसाठी। कर्ममार्ग परि योग्यांसाठी॥३:३॥

सोडू कर्मे, कोणी म्हणती। परि कर्मे त्यास न सोडिती॥
कर्मे सोडुनी घेतला संन्यास। तरी न मिळे मोक्ष त्यास॥३:४॥

स्वस्थ बसोनी कर्म न करावे। कोणासही ते शक्य नसावे॥
त्रिगुण हालविती, चालविती। बळजबरी कर्म करविती॥३:५॥

इंद्रियाते ठेवी दृढ बांधोनी। विषयविचार मात्र राही मनी॥
ते तर निव्वळ ढोंग म्हणावे। त्या मनुष्यासी मूर्ख मानावे॥३:६॥
परि मनाच्या सहाय्याने। इंद्रिये राखी नियमाने॥
कर्मे करी अनासक्त। नि:संशय तोचि श्रेष्ठ॥३:७॥
तू करावे आपुले कर्तव्यकर्म। तेचि हितकारक, न अकर्म॥
कर्म जरी कोणी टाळील। शरीर त्याचे कैसे जगेल?॥३:८॥

यज्ञ न समजे कर्मासी । कर्म बंधक होई त्यासी ॥
कर्म करावे अनासक्ति । मानोनी यज्ञात आहुति ॥३:९॥
ब्रह्मनिर्मित सृष्टि व यज्ञकर्म । लोकांनी पाळावे स्वधर्म ॥
हे यज्ञ पूर्ति करितील । तुमच्या कामनांची सकल ॥३:१०॥
तू स्वधर्माने देवांसी पूजावे । ते देव तुजवरी तुष्ट व्हावे ॥
तुम्ही एकमेकाते तुष्टवावे । आणि स्वहित साधावे ॥३:११॥

देवांसी स्वधर्मयज्ञाने जे पूजिती । देव तोषोनी कामना पुरविती ॥
जो ते न करी अर्पण त्यांसी । म्हणावे चोरचि तयासी ॥३:१२॥

जीवनयज्ञाचा प्रसाद भक्षिती । ऐसे मुनिजन पापमुक्त होती ॥
परि जो रांधी स्वत:साठी । तो बांधी पापची गाठी ॥३:१३॥

सजीव बनती अन्नापासून । अन्न बने पावसापासून ॥
यज्ञ पावसाचे कारण । तर कर्म यज्ञाचे कारण ॥३:१४॥

वेदांमध्ये कर्म सांगितले। देवापासून वेद निघाले॥
स्वधर्मकर्मयज्ञ करावा। त्यातची देव जाणावा॥३:१५॥

न जाणती हे चक्र अनिवार्य। जीवन त्यांचे निरर्थक होय॥
मग विषयसुखे त्यांस मोहविती। ते जीवन अपुले वाया घालविती॥३:१६॥

जो सदैव मग्न आत्मचिंतनी। आंतरिक आनंदात समाधानी॥
भय वासना किंचितही नसती। त्यासी नुरे कांही कर्म जगती॥३:१७॥

न कांही प्राप्तव्य कर्म करता । न दिसे हानि कर्म टाळता ॥

न तो कदापि मिळवो पाही । अन्य जीवापासोनी कांही ॥गीता ३:१८॥

म्हणोनी तू कर्तव्यकर्म करावे । कर्मफल सकल त्यागावे ॥

जो फळावरी नजर न ठेवे । तो मग तदाकारता पावे ॥३:१९॥

जनकादिक ज्ञानी अनासक्त । कर्म करोनी झाले मुक्त ॥

लोककल्याणास्तव तू पार्था । कर्म करणे योग्य सर्वथा ॥३:२०॥

जसे महाजन करिती आचरण। लोक त्यास मानिती धर्माचरण॥
महामार्ग त्यास जाणिती। त्यावरी मार्गक्रमण करिती॥३:२१॥
हे पार्थ, कर्तव्य काही। मला नसे लोकी तिन्ही॥
नसे काही वस्तु मिळविणे। कर्म करितो जनहिताकारणे॥३:२२॥
जी कर्मे करणे जरुरी। ती जरी मी न करी॥
जन चालतील, हे पार्था। माझाच मार्ग सर्वथा॥३:२३॥

सोडावी मी जरी कर्मे सारी । सृष्टिनाशाचा दोष मजवरी ॥
प्रजेत दुर्गुण सकळ बळावती । सर्वनाशाचे दायित्व माझे माथी ॥३:२४॥

अज्ञानीजन कर्तव्यकर्म करिती । परि मनी फळाची आशा धरिती ॥
ज्ञानीजनांनी तेचि कर्म करावे । अनासक्त, लोककल्याण साधावे ॥३:२५॥

कर्म जे लोक फलाशेने करिती । वाद न घाली ज्ञानी त्यांसोबती ॥
स्वये कर्म करी फलाशा त्यागुनी । आदर्श सामान्यांसी देई घालोनी ॥३:२६॥

माया आणि गुण तीन । समस्त कर्मांसी कारण ॥
मूर्ख जो लिप्त अहंकाराने । मी केले सर्व असे माने ॥३:२७॥
ज्यासी असती गुणकर्म ज्ञात । त्यासी अर्जुना, असे अवगत ॥
वसती विषयासंगे गुण तिन्ही । जाणोनी तो न किंचित मोही ॥३:२८॥
मायेच्या गुणभ्रमाने जे भुलती । ते अज्ञानी कर्मफलासक्त होती ॥
ज्ञानी न करी वाद त्यांसोबत । न करी त्यांचे चित्त विचलित ॥३:२९॥

सर्व कर्मे करोनी मजसी अर्पण । त्यागोनी फलासक्ति व कर्तेपण ॥
सदैव मजठायी दृढ भाव ठेवोनी । युद्ध कर तू मन शांत राखोनी ॥३:३०॥
जे श्रद्धापूर्वक आदर करिती । या मताची निंदा न करिती ॥
तदनुसार आचरण करिती । कर्मबंधापासून ते मुक्त होती ॥३:३१॥
माझ्या मतावरी टीका करिती । अनुसरण त्याचे न करिती ॥
ते जन मूर्ख, अज्ञानी होती । अविवेकी स्वनाश घडविती ॥३:३२॥

ज्ञानीही वागे स्वभावानुरूप त्याचे । वागणे असे गुणानुसार प्रत्येकाचे ॥

मग काय उपयोग बळजबरीचा? । प्रयत्न स्वभावाविरुद्ध जाण्याचा? ॥३:३३॥

विषयवासना वा तिरस्कार । नित्य ज्ञानेंद्रियांचा व्यवहार ॥

न पडावे बळी त्या भावनांसी । त्या होती कारण नाशासी ॥३:३४॥

होई जरी दोषपूर्ण स्वधर्म । तोचि आचरावा, न परधर्म ॥

स्वधर्मात मृत्युही हितकारक । परधर्म मात्र असे भयदायक ॥३:३५॥

मग अर्जुन कृष्णाते विचारी। नसे इच्छा मनुष्याची जरी॥
पापकर्म का तो करी। अनिच्छेनेही बळजबरी? ॥३:३६॥

**भगवान म्हणती -**

काम व क्रोध पाप करविती। जे रजोगुणापासोनी निपजती॥
रजोगुण पापी, भूक त्याची न निवे। या जगती वैरी त्यासी जाणावे॥३:३७॥

जैसा धूर झाके अग्नीते। धूळ झाके आरशाते ॥
जैसी वार झाके गर्भाते। तैसा काम झाके ज्ञानाते ॥३:३८॥

हा काम असे, कौन्तेय। वैरी ज्ञानीजनांचा नित्य ॥
न शमे ऐसा हा अग्नि। आत्मज्ञानाते झाकोनी ॥३:३९॥

या कामाचे अधिष्ठान। इंद्रिये, बुद्धि व मन ॥
तयांद्वारे ज्ञान झाकवी। काम जीवासी भ्रमवी ॥३:४०॥

यास्तव इंद्रियांसी नियमावे । अन् पापी कामासी मारावे ॥
जो नष्ट करी सकल ज्ञानाते । ऐहिक, पारमार्थिक दोन्हीते ॥३:४१॥

इंद्रिये श्रेष्ठ शरीरापरि । मन श्रेष्ठ इंद्रियांपरि ॥
मनापरि असे बुद्धि श्रेष्ठ । परमात्मा त्याहून श्रेष्ठ ॥३:४२॥

तू परमात्म्यासी जाणावे ऐसे । अर्जुना, जो बुद्धिपरि श्रेष्ठ असे ॥
मग आत्मस्वरूपी स्थिर व्हावे । बलाढ्य शत्रु कामासी मारावे ॥३:४३॥

** अध्याय ३ समाप्त**

## ॥ अध्याय ४ ॥

श्रीकृष्ण म्हणती, मी सांगितला। पूर्वी हा योग विवस्वान सूर्याला ॥
त्याने सांगितला मग तो मनूसी। मनूने तो उपदेशिला इक्ष्वाकूसी ॥४:१॥
हा योग एकाने दुसऱ्याला। हे अर्जुना, असा शिकविला ॥
जो राजर्षींना समजला। तो कालौघात नष्ट पावला ॥४:२॥

तू अससी माझा सखा व भक्त । तुजसी सांगितला हा योग गुप्त ॥
जो असे उत्कृष्ट आणि प्राचीन । असे म्हणती अर्जुनासी भगवान ॥४:३॥

पार्थ आश्चर्याने म्हणे केशवासी । तू अससी अलिकडे जन्मलासी ॥
पण सूर्य तर अति प्राचीन असावा । मग तू योग त्यासी कैसा सांगावा? ॥४:४॥

**भगवान म्हणती -**

गेले होऊन जन्म माझे अनेक। तैसेचि तुझे अर्जुना कितीक॥
मला ते सर्व माहीत असती। तुला मात्र ते माहीत नसती॥४:५॥

मी अजन्मा, अमर असतो। सकल भूतांसी नियमितो॥
परी माया माझी पांघरुनी। मी येई जगी जन्म घेऊनी॥४:६॥

जेव्हां धर्माचा ऱ्हास होई। आणि अधर्म वरचढ होई॥
तेव्हां मी होई अवतीर्ण। हे तत्त्व अर्जुना, तू जाण॥४:७॥

तारण करण्या सज्जनांचे। निवारण करण्या दुर्जनांचे ॥
करणे पुनर्स्थापन धर्माचे। कार्य माझे युगावताराचे ॥४:८॥
माझे जन्म कर्म दिव्य असती। हे तत्त्वत: जे पुरुष जाणती ॥
पुनर्जन्म नसे मृत्युपश्चात। ते मजसी पावती,  हे पार्थ ॥४:९॥
काम, क्रोध, भीति हे दोष गेले। जे माझ्याशी एकरूप झाले ॥
असे ज्ञानतपस्वी पवित्र झाले। त्यांसी माझे प्रेम प्राप्त झाले ॥४:१०॥

जो जैशा भावे भजे मजसी। मी तयाची इच्छा पुरवी तैसी ॥
जन सकल माझ्या मार्गे चालती। आप आपुली पद्धति अनुसरती ॥४:११॥
कर्मफलाशा धरूनी मानसी। पूजिती इहलोकी देवतांसी ॥
त्यांची होई कामनापूर्ति। विनाविलंब या जगती ॥४:१२॥
चार वर्ण मी जगी निर्मिले। गुणकर्मानुसार आपआपुले ॥
परि त्यांचा नसे मी कर्ता। जाण मी अव्यय, अकर्ता ॥४:१३॥

कर्मे मजसी कदापि न बांधिती । नसे कर्मफलाची मज आसक्ति ॥

तत्त्व कळले, वळले ज्याला । कर्म न बांधू शके त्याला ॥४:१४॥

पूर्वी मुमुक्षूंनी हे जाणिले । त्यानुसार त्यांनी कर्म केले ॥

तू सुद्धा तसेच कर्म करावे । त्यांनाच सर्वथा अनुसरावे ॥४:१५॥

कर्म अकर्माचे वर्म गहन । न जाणती पंडित विद्वान ॥

ते कर्म विशद करीन तुजसी । जाणोनी तू दु:खमुक्त होसी ॥४:१६॥

कर्म म्हणजे काय ते जाणावे। विकर्मही समजोनी घ्यावे ॥
अकर्माचे सुद्धा घ्यावे ज्ञान। या संकल्पना अति गहन ॥४:१७॥
जो पाही कर्मात अकर्म। आणि अकर्मात कर्म ॥
तो जरी कर्मे सकळ करी। तो योगी व ज्ञानी तरी ॥४:१८॥
कर्म ज्याचे होय फलाशेविना। नसे कांही भविष्याची कल्पना ॥
त्यासी जाणकार ज्ञानी म्हणती। ज्ञानाग्नीत त्याची कर्मे जळती ॥४:१९॥

जो त्यागी कर्मफलाची स्पृहा। आत्मानंदी तृप्त, त्यागुनी मोहा॥
तो कर्मे करी सकळ जरी। असे अकर्ता सर्वथा तरी॥४:२०॥

आशा, संपत्तिलालसा सोडूनी। मन बुद्धीवरी ताबा मिळवुनी॥
करी कर्मे शरीर रक्षण्यासी। कर्मबंधन कदापि नसे त्यासी॥४:२१॥

सहज लाभले त्यात समाधानी। जो गेला सर्व द्वैतासी लंघुनी॥
निर्मत्सर, कर्मफलाप्रती अलिप्त। तो कर्म करी, तरी कर्मबंधमुक्त॥४:२२॥

धर्माधर्माप्रती उदासीन, अलिप्त । ज्याचे मन आत्मज्ञानाने तृप्त ॥
तो मानी कर्मासी यज्ञाहुति । ती कर्मे फलासहित नष्ट होती ॥४:२३॥

यज्ञाहुति, पुरोहित, यज्ञसाहित्य । आदि ब्रह्मनिष्ठासी ब्रह्मचि नित्य ॥
मानी कर्मासी ब्रह्म निखळ । कर्मफलही त्यासी ब्रह्म केवळ ॥४:२४॥

कोणी करी देवताप्रती यज्ञ । जयासी म्हणती दैवयज्ञ ॥
दुसरे कोणी आत्माहुति देती । ब्रह्माग्नीमध्ये स्वस्वरूप अर्पिती ॥४:२५॥

कोणी ज्ञानेंद्रियांवरी ताबा राखिती । संयमाच्या अग्नीमाजी आहुति देती ॥
तर विषयांसी अर्पिती इतर कोणी । त्यास ज्ञानेंद्रियांचा यज्ञ मानोनी ॥४:२६॥

आत्मज्ञानाने दुसरे कोणी । स्वसंयम अग्नि पेटवुनी ॥
त्या यज्ञामाजी अर्पिती । ज्ञानेंद्रिये व प्राणाहुति ॥४:२७॥

कोणी आहुति देई द्रव्याची । दुसरा कोणी त्रिविध तपाची ॥
कोणी करी अष्टांगयोगसाधन । कोणी शास्त्राभ्यास, मननचिंतन ॥४:२८॥

कोणी मिसळती प्राणात अपान। कोणी मिसळी अपानात प्राण ॥

कोणी रोधुनी श्वास कुंभक करिती। प्राणायामपरायण यांते म्हणती ॥४:२९॥

इतर कोणी आहार नियमिती। प्राण प्राणामाजी मिसळिती ॥

हे जे योगी यज्ञाते जाणिती। यज्ञ करोनी पापाते नाशिती ॥४:३०॥

जे यज्ञावशिष्ट प्रसाद भक्षिती। ते चिरंतन ब्रह्मासी प्राप्त होती ॥

यज्ञभावरहितासी इहलोक अप्राप्त। मग परलोक दूरचि होय, हे पार्थ ॥४:३१॥

हे यज्ञ वेदात वर्णिले । ते कर्मातुनी उपजले ॥
हे जेव्हां तू जाणसी । तेव्हां तू मुक्त होसी ॥४:३२॥

द्रव्ययज्ञापरी, हे पार्थ । ज्ञानयज्ञ असे श्रेष्ठ ॥
सकल कर्मांचा अंत । होई ज्ञानप्राप्तीत ॥४:३३॥

जो इच्छी ते उत्तम ज्ञान । त्याने ज्ञान्यासी द्यावा मान ॥
करावी सेवा त्यांची, प्रार्थावे । त्यांच्याच कृपेने ज्ञान मिळावे ॥४:३४॥

जेव्हां ते ज्ञान होईल प्राप्त । मग न भासेल भ्रामक द्वैत ॥

सकल भूते दिसतील तुजमाजी । आणिक ती दिसतील मजमाजी ॥४:३५॥

महापापी जरी तू अससी । महासागर पापाचा तरसी ॥

ज्ञानरूपी नाव नेईल पैलतीरा । जरी तू घेशील तिचा आसरा ॥४:३६॥

अग्नीमध्ये इंधन, पार्था । होई जळोनी राख सर्वथा ॥

तैसी कर्मे सकल जळती । ज्ञानाग्नीमाजी भस्म होती ॥४:३७॥

ज्ञानासारखे पवित्र कांही । या जगात दुसरे नाही ॥
जो झाला असे योगी अलिप्त । त्यासी योग्य वेळी स्वये प्राप्त ॥४:३८॥

इंद्रिये संयत, साधन नियमित । श्रद्धा अपार अविचलित ॥
तयासी लाभे ज्ञान उत्तम । आणि मग चिरशांति परम ॥४:३९॥

अज्ञानी, अश्रद्ध, संशयी । असा मनुष्य नष्ट होई ॥
तयासी न लाभे हा इहलोक । न परलोक, न कदापि सुख ॥४:४०॥

कर्मे थांबली योगाभ्यासाने । आणि संशय नाशले ज्ञानाने ॥
स्वस्वरूप ओळखले ज्याने । तो कदापि नसे बद्ध कर्माने ॥४:४१॥

अज्ञानातून हा संशय निपजला । आणि जो तुझ्या मनी वसला॥
त्यासी पार्था, ज्ञानशस्त्राने मारुनी । ऊठ लढण्या, कर्मयोग स्वीकारुनी ॥४:४२॥

** अध्याय ४ समाप्त**

## ॥ अध्याय ५ ॥

अर्जुन म्हणे भगवंतासी । कधी कर्मसंन्यास सांगसी ॥
कधी योगाची करिसी स्तुति । हितकर ते एक सांग निश्चिती ॥५:१॥
कर्मयोग व संन्यास उभय असती । मोक्षदायक, असे भगवंत म्हणती ॥
परि दोन्हीची जरी तुलना करता । कर्मयोग सरस कर्मसंन्यासापरता ॥५:२॥

वासना वा द्वेषभावना न होय । त्यासी म्हणावे संन्यासी नित्य ॥
जो असे सर्व द्वैतापार, पार्थ । तो असे प्रपंचातून सहज मुक्त ॥५:३॥
सांख्य, कर्मयोगाची फलनिष्पत्ति । अज्ञानी जन भिन्न मानिती ॥
ज्ञानीजन तसे न म्हणती । एक अनुसरावा, दोन्ही फळती ॥५:४॥
जे प्राप्त सांख्ययोगाने । तीच प्राप्ति कर्मयोगाने ॥
दोन्हीते एकचि जाणती । तेचि ज्ञानी म्हणविती ॥५:५॥

कर्मयोगचि सुलभ मोक्षदाता। त्याविणा कठीण मुक्ति, पार्था॥
जो होई योगी कर्मे करूनी। होई मुक्त सत्वर कर्मातुनी॥५:६॥

शुद्ध झाले कर्मयोग्याचे चित्त। आणि इंद्रिये ज्याची ताब्यात॥
ओळख ज्याची सर्व भूतमात्र। त्यासी नसे कर्मबंध तिळमात्र॥५:७॥

योगी पाही, ऐकी, चाली, स्पर्श करी। वास घेई, झोपी जाई, अन्नग्रहण करी॥
संभाषण करी, उत्सर्जी, स्वीकारी। डोळे उघडी, बंद करी, परी धरी॥

भाव दृढ मनी इंद्रिये असती कार्यरत। आप आपुल्या विषयी स्वभावजात॥

त्याचा भाव अकर्तेपणाचा अनासक्त। जरी कर्मे तो करी सकळ जी प्राप्त॥५:८,९॥

फलाशारहित कर्मे करी। परमतत्त्वासी अर्पण करी॥

त्यासी पाप बाधक नसे। कमलपत्र पाण्यात जसे॥५:१०॥

योगी कर्म करी शरीराने। मनाने, बुद्धीने, इंद्रियाने॥

न ठेवी फलाशा किंचित। हेतु हा शुद्ध व्हावे चित्त॥५:११॥

स्वस्वरूप ओळखिले । व कर्मफल त्यागिले ॥

त्यासी लाभे चिरशांति । इतरांसी फलाशा बांधिती ॥५:१२॥

अध्यात्मज्ञान जयासी प्राप्त । तो होई सर्वस्वी कर्मसंन्यस्त ॥

नवद्वारांच्या शरीरात सुखात । जगे न करता करविता किंचित ॥५:१३॥

न कर्तेपणाची भावना । न लोकांची कर्मे नाना ॥

न फलासाठी प्रभु कारण । हे सर्व घडे आपल्या आपण ॥५:१४॥

ना कोणाचे पुण्य, ना पाप । प्रभूसी नसे त्याचा ताप ॥
ज्ञान झाकले अज्ञानाने । म्हणून ते ग्रासले मोहाने ॥५:१५॥
अज्ञान नाशले ज्यांचे । प्रकाशाने आत्मज्ञानाचे ॥
सूर्यसमान ज्ञान त्यांचे ते । प्रकाशी प्रत्यक्ष परमतत्त्वाते ॥५:१६॥
जे ब्रह्मनिष्ठ, ब्रह्मस्वरूप असती । ते जन्ममृत्युचक्रातुनि मुक्त होती ॥
ते ज्ञानी स्वस्वरूपासी ओळखती । यास्तव त्यांची पापे धुऊन जाती ॥५:१७॥

विद्वान, विनयी, ज्ञान ज्यासी । सकलांमध्ये पाहाती ब्रह्मासी ॥
शूद्र असो वा पंडित ब्राह्मण । गाय असो वा गज वा श्वान ॥५:१८॥

स्थितप्रज्ञ अवस्था मनाची । जिंकिले जन्ममृत्यु इथेचि ॥
ते वसती ब्रह्मात नित्य । ब्रह्म असे निर्दोष सत्य ॥५:१९॥

ज्याचे मनबुद्धि स्थिर, अविद्या नष्ट । अशा ब्रह्मनिष्ठासी ना हर्ष ना कष्ट ॥
मग भले लाभो इंद्रियसुख । वा भोगावे लागो इंद्रियदु:ख ॥५:२०॥

भुलवी न ज्यासी विषयसुख। त्यासी लाभे आत्मसुख॥
होई जेव्हां तो ब्रह्मस्वरूप। मग तोचि चिदानंदरूप॥५:२१॥

विषयसुख क्षणभंगुर असे। येई, कालांतरे जाई तसे॥
सुख संपल्याने दु:ख होई। ज्ञानी त्यात रस न घेई॥५:२२॥

कामक्रोधावेग सहन करी। शरीर असे जीवित जोवरी॥
त्यासी म्हणावे योगयुक्त। तोचि असे खरा सुखात॥५:२३॥

जो योगी आत्मसुखी तृप्त । आत्मज्ञानाने प्रकाशित ॥

प्रपंचातून सर्वस्वी मुक्त । होई तो विलीन ब्रह्मात ॥५:२४॥

जे असती पापरहित । मन जिंकुनी द्वैतातीत ॥

सर्व भूतांप्रती हितैषी । ब्रह्मानंद प्राप्त त्यांसी ॥५:२५॥

ज्यांनी कामक्रोध त्यागिले । आपुले मन ज्यांनी नियमिले ॥

ज्यांना आत्मस्वरूप समजले । जीवनी, मृत्युपश्चात मुक्त झाले ॥५:२६॥

विषय त्यागिले, ध्यान भिवयांमध्ये । प्राण विसर्जिले ज्याने नाकामध्ये ॥

इंद्रिये, मन, विचार केले नियंत्रित । विकार नाशले ज्याने, तो सदा मुक्त ॥५:२७, २८॥

मी ईश्वर, यज्ञांचा भोक्ता । सकल भुवनांचा नियंता ॥

सर्वांचा हितैषी हे जाणती । ते ब्रह्मानंद प्राप्त करिती ॥५:२९॥

**अध्याय ५ समाप्त**

# ॥ अध्याय ६ ॥

कर्तव्यकर्मे सकल करी । परि फलाशा न धरी ॥
तोचि संन्यासी व योगी । न कि जो कर्मे त्यागी ॥६:१॥
म्हणती संन्यास ज्ञानीजन । हे पार्थ, योग तोचि जाण ॥
न शके वासनांसी त्यागी । तो कदापि न होई योगी ॥६:२॥

योगी होणे ज्या साधकासी । कर्मयोग हे साधन असे त्यासी ॥

योग साध्य होई त्यासी जेव्हां । कर्मे सरूनी शांति मिळे तेव्हां ॥६:३॥

विषयसुखांपासून अलिप्त । कर्माविषयी नसे आसक्त ॥

वासना समस्त त्यागी । त्यासी म्हणावे योगी ॥६:४॥

आपुला उद्धार हाती आपुले । नुकसान न करावे आपुले ॥

आपुले मन असे बंधु आपुला । आणि तैसेचि शत्रु आपुला ॥६:५॥

स्वयेचि जिंकिले स्वत:सी। तो स्वत:चा बंधु व हितैषी॥
स्वत:वरी जो न विजयी होई। शत्रु आपुला आपणचि होई॥६:६॥

जिंकिले ज्याने मनासी। प्राप्त झाला शांतीसी॥
तो लीन परमेश्वरी। मन त्याचे अविकारी॥६:७॥

ऐहिक, ब्रह्मज्ञान ज्यासी समस्त। ज्याने इंद्रिये केली पराजित॥
असो लोह, कांचन वा शिला। सम भासे, तोचि योगी झाला॥६:८॥

सुहृद वा मित्र वा शत्रु भेदातीत । उदासीन, तिरस्करणीय, मध्यस्थ ॥

आप्त, साधु, पापी सम मानावे यांसी । सकलापरी विशेष म्हणावे त्यासी ॥६:९॥

योग्याने एकांतात रहावे । शरीर, मन काबूत ठेवावे ॥

करू नये परिग्रह वा वासना । असावी आत्मस्वरूपी धारणा ॥६:१०॥

योगाभ्यासासाठी पवित्र स्थान । खाली दर्भासन, वरी मृगाजिन ॥

मग त्यावरी एक वस्त्र अंथरावे । आसन जाड वा पातळ नसावे ॥६:११॥

त्या आसनावरी स्वस्थ बसावे। तिथे मन ध्यानी एकाग्र करावे ॥
इंद्रियक्रिया व विचार रोधावे। या अभ्यासाने चित्त शुद्ध करावे ॥६:१२॥

असावे मस्तक, मान, शरीर। रेषेत एका सरळ व स्थिर ॥
दृष्टि नाकाच्या शेंड्याकडे। फिरू नये तिने इकडे तिकडे ॥६:१३॥

योग्याने प्रसन्न ठेवावे आपुले चित्त। नसो द्यावी भीति कसली किंचित ॥
ब्रह्मचर्य पाळोनी मन नियमावे। चिंतन व विचार माझेच करावे ॥६:१४॥

मन एकाग्र परमतत्त्वावरी । योगी राखी ताबा मनावरी ॥

त्यासी मिळे परमशांति । होई परमपदाची प्राप्ति ॥६:१५॥

अति खाई त्यासी योग न साधे । उपाशी राहणाऱ्यासीही न साधे ॥

अति झोपे त्यासी योग न साधे । जागरण करणाऱ्यासीही न साधे ॥६:१६॥

ज्याचा आहार असे मित । व व्यवहार सकल नित ॥

निद्राही नियमित होय । योगाने दु:ख नष्ट होय ॥६:१७॥

आत्मस्वरूपी स्थित। एकाग्र ज्याचे चित्त ॥
वासना सकल नष्ट। त्यासी म्हणावे युक्त ॥६:१८॥

दिवा ठेविला भिंगात। मग न फडफडे ज्योत ॥
योगी आत्मस्वरूपी रत। चित्त न होय विचलित ॥६:१९॥

योगाभ्यासे नियंत्रित चित्त। कर्मापासोनि होई निवृत्त ॥
पाही आत्मस्वरूप स्वयेचि। घेई अनुभूति परमानंदाची ॥६:२०॥

ब्रह्मानंद बुद्धीपलिकडे, अनंत । त्याचा अनुभव इंद्रियातीत ॥
ज्या योग्यासी तो होय प्राप्त । तो ब्रह्मनिष्ठ होई स्वस्थचित्त ॥६:२१॥

ब्रह्मानंद प्राप्त होता योग्यासी । दुजा श्रेष्ठ लाभ न वाटे त्यासी ॥
दु:ख असे त्यास अत्यंत जरी । चित्त न होई विचलित तरी ॥६:२२॥

जो नष्ट करी दु:खबंधन । तयासी तू योग जाण ॥
त्यासी अनुसरावे साधकाने । निश्चयपूर्वक स्वस्थचित्ताने ॥६:२३॥

सकल संकल्प त्यागोनी । वासना समस्त सोडोनी ॥
इंद्रिये नियमावी योग्याने । आपल्या मनाच्या सहायाने ॥६:२४॥

लाभे हळुहळू बुद्धीसी धैर्य । मग चित्तासी लाभे स्थैर्य ॥
केवळ चिंती परमेश्वरासी । नसे ठाव दुजा विचारासी ॥६:२५॥

धावे जिथे चंचल मन । निश्चये आणावे खेचून ॥
करावे त्यासी केंद्रित । आत्मस्वरूपी शाश्वत ॥६:२६॥

चित्त ज्या योग्याचे तृप्त । जो पापरहित ब्रह्मीभूत ॥
रजोगुण नि:शेष नष्ट । लाभे ब्रह्मानंद उत्कृष्ट ॥६:२७॥

हा योग आत्मचिंतनाचा । एकमेव ध्यास योग्याचा ॥
अनुभूति परब्रह्माची त्यासी । परमानंद त्या पापरहितासी ॥६:२८॥

परमात्म्याशी तदाकार । योग्याची प्रज्ञा अति स्थिर ॥
स्वत:सी पाहे भूतांमाजी । पाही भूते स्वत:माजी ॥६:२९॥

सर्वत्र मजसीच पाही। मजमाजी सर्व कांही॥
तो मजसी न अंतरे। मी त्यासी न अंतरे॥६:३०॥

मी वसे सकल भूतांमाजी। त्या मजसी एकनिष्ठे भजी॥
कांहीही कर्म करी तो योगी। तरी मजसी कदापि न त्यागी॥६:३१॥

योगी सुख वा दु:ख दोन्ही। स्वत:पासून भिन्न न पाही॥
सर्वांप्रती समत्वभाव असे। तोचि श्रेष्ठ मत माझे असे॥६:३२॥

अर्जुन म्हणे भगवंतासी । समत्वयोग जो वर्णिलासी ॥
तो मजसाठी अतिकठीण । कारण माझे अस्थिर मन ॥६:३३॥

मन चंचल, हे भगवान । दुराग्रही, अतिबलवान ॥
दुष्कर त्यासी नियमिणे । वाऱ्याला नियमू पाहाणे ॥६:३४॥

भगवान म्हणती अर्जुनासी । अतिकठीण नियमिणे मनासी ॥
परि प्रयत्नाने ते शक्य होई । जेव्हां वैराग्यभाव दृढ होई ॥६:३५ ॥

ज्यांचे मन नसे नियंत्रित। त्यांसी योग न होई प्राप्त॥
प्रयत्ने मनाते नियमिती। ते कालांतरे योगी होती॥६:३६॥

कृष्णासी म्हणे अर्जुन। साधक असे निष्ठावान॥
परि तोकडा अभ्यासी। मग काय गति त्यासी?॥६:३७॥

योग असाध्य ज्या साधकासी। तो मुके ऐहिक व परमार्थासी॥
हे महाबाहो, तो पडे विनाशी। जसा तुटलेला मेघ विरे आकाशी॥६:३८॥

या माझ्या संशयाचे निरसन । तूच करू शकसी, हे भगवन ॥
ते न करू शके अन्य कोणी । तुजवाचूनी, हे चक्रपाणि ॥६:३९॥
भगवान म्हणती अर्जुनासी । जो मनुष्य कांक्षी योगासी ॥
न मुके इहलोक, परलोकासी । स्वहित वांछी, न जाई दुर्गतीसी ॥६:४०॥
जो बहु पुण्यवान, योगभ्रष्ट होई । तो स्वर्ग वा तत्सम लोकी जाई ॥
राही मग तेथे कांही काळवरी । पुन्हा जन्मे या जगी श्रीमंताघरी ॥६:४१॥

किंवा परत येई जन्मुनी । पोटी योग्यांच्या ज्ञानी ॥
असा जन्म या जगती । समज असे दुर्लभ अति ॥६:४२॥
अशा कुळी होय जन्म प्राप्ति । मग पूर्वजन्मीची योगासक्ति ॥
त्यासी प्राप्त होई त्वरित । योगाभ्यास असे सुरळीत ॥६:४३॥
पूर्वाभ्यास लाभे, असे विवश जरी । योगाभ्यास त्यासी आकृष्ट करी ॥
योगाप्रती जो जिज्ञासु होय । तोही कर्मकांड लंघोनि जाय ॥६:४४॥

नित्य योगाभ्यास करीतसे । व जो योगी पापमुक्त असे ॥
जन्मजन्मांतराच्या अभ्यासे । त्यासी परमगति प्राप्त होतसे ॥६:४५॥

योगी तपस्व्यांपेक्षा श्रेष्ठ । आणि ज्ञान्यापेक्षाही श्रेष्ठ ॥
कर्मकर्त्यांहूनही असे श्रेष्ठ । यास्तव व्हावे योगी, पार्थ ॥६:४६॥

जो तल्लीन मजमाजी । एकनिष्ठे मजसी भजी ॥
तो श्रेष्ठ सकल योग्यांत । हे जाण असे माझे मत ॥६:४७॥

** अध्याय ६ समाप्त**

# ॥ अध्याय ७ ॥

भगवान म्हणती, ऐक पार्था । मज ठायी ठेव चित्त सर्वथा ॥
येऊनी सर्वथैव शरण मजसी । मज साकल्याने मग जाणसी ॥७:१॥

मी ज्ञान विज्ञानासहित । तुजसी करीन कथित ॥
ते जाणता मग इही । जाणण्यासी नुरे कांही ॥७:२॥

एखादा विरळा मनुष्य हजारी। माझ्या प्राप्तीचा प्रयत्न करी॥
अनेक प्रयत्न करणारामाजी। एखादा मजसी यथार्थ समजी ॥७:३॥
भूमि, पाणी, तेज ही तीन। व वायु, आकाश ही दोन॥
मन, बुद्धि, अहंकार सोबती। ही माझी अष्टांगी प्रकृति ॥७:४॥
ही माझी प्रकृति निकृष्ट। अपरा, जिच्यापेक्षा श्रेष्ठ॥
माझी परा प्रकृति दुजी। प्रसवे पोषे सृष्टीसी जी ॥७:५॥

या दोन माझ्या प्रकृति । जीवमात्रांसी निर्मिती ॥
कारण जाणावे मजसी । सृष्टिनिर्मिती विनाशासी ॥७:६॥

माझ्याहून श्रेष्ठ, हे धनंजय । या जगती नसे कांही अन्य ॥
धागा जेवी धरी मण्यांते । मी धरिले समस्त सृष्टीते ॥७:७॥

पाण्यातील गोडी मी । चंद्रसूर्यांचा प्रकाश मी ॥
वेदांत ओम, शब्द नभात । पार्था, शौर्य मी मनुष्यात ॥७:८॥

पृथ्वीतील शुद्ध गंध मी । अग्नीतील उष्णताही मी ॥
सजीवातील जीवन मी । व तपस्व्यातील तप मी ॥७:९॥

हे अर्जुना, मीचि समज । सकल भूतमात्रांचे बीज ॥
व बुद्धिमंतांची बुद्धि मी । तेजस्वी व्यक्तींचे तेज मी ॥७:१०॥

जयासी नाही वासना आसक्ति । मी असे त्या बलवंताची शक्ति ॥
मीचि होय धर्मानुकूल वासना । भूतांमधली सकल, हे अर्जुना ॥७:११॥

रज, तम, सत्व गुण । मजपासुनी निष्पन्न ॥
मी नसे त्यामाजी । जरी ते मजमाजी ॥७:१२॥

त्रिगुणांनी मोहित । असे हे सकल जगत ॥
मी असे त्रिगुणातीत । म्हणून त्यासी अज्ञात ॥७:१३॥

दैवी त्रिगुणात्मक माया । अतिकठीण असे तराया ॥
शरण सर्वस्वी येई मजसी । तो पार करी मायानदीसी ॥७:१४॥

पापी, मूढ, दुराचारी । ज्यांचा स्वभाव आसुरी ॥
मायेने नष्ट ज्यांचे ज्ञान । ते न येती मजसी शरण ॥७:१५॥
पुण्यात्मे मजसी भजती । चार प्रकारचे ते असती ॥
म्हणविती अर्थार्थी, आर्त । जिज्ञासु व ज्ञानी, हे पार्थ ॥७:१६॥
ज्ञानी त्या चारामाजी । सदैव तल्लीन मजमाजी ॥
तो मजसी अधिक प्रिय । तेवीचि तयासी मी प्रिय ॥७:१७॥

सकल भक्त उत्तम माझे मत । परि माझा आत्मा ज्ञानीभक्त ॥

त्याचे चित्त मजठायी लीन । मी त्याचे अंतिम आश्रयस्थान ॥७:१८॥

होई ज्ञान्यासी माझी प्राप्ति । त्यास जन्म कितीक लागती ॥

जो पाही मजसी सर्वामाजी । तो महात्मा दुर्लभ जगामाजी ॥७:१९॥

ज्ञान नष्ट वासनांनी ज्यांचे । न चाले स्वभावापुढे त्यांचे ॥

विधिपूर्वक उपासिती कोण्या । एका देवासी वासना पुरविण्या ॥७:२०॥

ज्या देवावरी असे निष्ठा । तयासी भक्त पूजी सर्वथा ॥
देवावरील श्रद्धा भक्ताची । दृढ करणारा असे मीचि ॥७:२१॥
भक्ताची निष्ठा ज्या देवावरी । त्याची पूजाभक्ति तो करी ॥
ज्या वासना मी त्यासी देई । त्यांची पूर्ति स्वयेचि होई ॥७:२२॥
जयांची बुद्धि असे संकुचित । त्यांसी मिळे फळही निकृष्ट ॥
देवताभक्तांसी देवलोक प्राप्ति । माझ्या भक्तासी माझी प्राप्ति ॥७:२३॥

माझे स्वरूप असे शाश्वत । उत्कृष्ट आणि अव्यक्त ॥
परि ते अज्ञानी न जाणती । मज शरीरधारी मानिती ॥७:२४॥
योगमायेने झाकिले मजसी । म्हणूनी मी न दिसे जनासी ॥
मी तर अजन्मा व अविनाशी । परि नसे हे ज्ञात मूढ जनासी ॥७:२५॥
समस्त भूते जशी मागील । तशी भविष्यात असतील ॥
ती मजसी ज्ञात असती । मजसी न कोणी जाणती ॥७:२६॥

सृष्टिसोबत, हे पार्थ। आवडीनावडीचे द्वैत॥
मोहवी समस्त भूतांना। असे जाण, हे अर्जुना॥७:२७॥

जे व्रताचरणी दृढ राहिले। पुण्यकर्माने पाप नाशले॥
ते मोहातुनी मुक्त होती। द्वैत त्यागुनी मज पूजिती॥७:२८॥

जे जन मजसी शरण येती। कांक्षिती जरामरण मुक्ति॥
ते ब्रह्मन् यथार्थ जाणिती। अध्यात्म कर्म समजती॥७:२९॥

जे योगी जाणती मजसी । व अधिदैव, अधियज्ञासी ॥
त्यांचे एकत्व माझ्याशी । मृत्युकाली स्मरती मजसी ॥७:३०॥

** अध्याय ७ समाप्त**

# ॥ अध्याय ८ ॥

ब्रह्म काय? अध्यात्म काय? । कर्म, अधिभूत म्हणजे काय? ॥
अधिदैव म्हणतात कशासी? । असे अर्जुन विचारी कृष्णासी ॥८:१॥
अधियज्ञ कसा व कोण । या शरीरी, हे मधुसूदन? ॥
ज्यांनी नियंत्रिले स्वत:सी । कसे अंतकाली स्मरती तुजसी? ॥८:२॥

ब्रह्मन् अविनाशी व परम। स्वभाव म्हणजे अध्यात्म ॥
भूतमात्र उपजती त्यापासून। ते असे कर्म, वदले भगवन ॥८:३॥

मनोविकार क्षणभंगुर ते अधिभूत। जग अनुभवे पुरुष तो अधिदैवत ॥
शरीरी वसे निव्वळ साक्षीभावी। तो मीचि अधियज्ञ म्हणवी ॥८:४॥

समीप येता मृत्युक्षण। जो राखी माझे स्मरण ॥
तो मजसीचि प्राप्त होय। यात तिळमात्र नसे संशय ॥८:५॥

मनुष्य शरीरत्याग करी । तेव्हां जो भाव मनी धरी ॥
मग होई पुनर्जीवित । तोचि भाव पुन्हा धरीत ॥८:६॥
तेव्हां तू मजसी अर्पावी । मन आणि बुद्धि सर्वस्वी ॥
मज स्मरणी युद्ध करावे । नि:संशय माझाची व्हावे ॥८:७॥
मनासी भरकटू न द्यावे । प्रयत्ने मजठायी ठेवावे ॥
व्हावे परमपुरुषी विलीन ॥ जो असे दिव्य, हे अर्जुन ॥८:८॥

सर्वज्ञ, अनादि, भूतांचा नियंता। अतिसूक्ष्म, सकलांचा पोषणकर्ता॥
सूर्यासम तेजस्वी परमेश्वर। असे तमसापासोनी अतिदूर ॥८:९॥

मृत्युसमयी स्थिरचित्ते। आज्ञाचक्री धरी प्राणाते॥
परमेश्वराच्या अनुसंधानी। तो जाई परब्रह्मी मिळोनी ॥८:१०॥

वेदज्ञानी अक्षर म्हणती जयासी। ते स्थान होई प्राप्त त्या योग्यांसी॥
ज्यांचे काम क्रोध विकार नाशले। व ज्यांनी ब्रह्मचर्य व्रत अनुसरले ॥८:११॥

सर्व शरीरद्वारे बंद करी । मन हृदयी स्थिर करी ॥
प्राण मस्तकी दृढ धरी । योगी एकाग्र चित्त करी ॥८:१२॥

ओम अक्षराते उच्चारुनी योगी । मजसी स्मरुनी शरीराते त्यागी ॥
ओम हे अक्षर ब्रह्मचि अव्यक्त । म्हणून योग्यास परमगति प्राप्त ॥ ८:१३॥

योगी सदा माझे अनुसंधानी । ज्याचे चित्त सदैव समाधानी ॥
जो मन ठेवी एकाग्र मजठायी । मी प्राप्त सहजपणे त्यासी होई ॥८:१४॥

ज्यांसी लाभली परमगति । ते महात्मे पुन्हा न येती ॥
आणखी एका जीवनासाठी । दु:खमय क्षणभंगुर जगती ॥८:१५॥

समस्त भुवने ब्रह्मलोकासहित । निर्मिति, नाश त्यांचा निश्चित ॥
परि ज्यासी होई मी प्राप्त । त्यासी नसे पुनर्जन्म खचित ॥८:१६॥

चार युगे हजारदा येती जाती जेव्हां । ब्रह्मदेवाचा दिवस एक होई तेव्हां ॥
मग येई तेवढीच त्याची एक रात । दिवस रात्र जाणती त्यासी हे ज्ञात ॥८:१७॥

ब्रह्मदेवाचा दिवस होई जेव्हां । भूते अव्यक्तातुनी व्यक्त तेव्हां ॥
होई रात्र ब्रह्मदेवाची जेव्हां । भूते अव्यक्तात जाती पुन्हा ॥८:१८॥
हे अर्जुना, या सजीव निर्जीव । समस्त प्राण्यांचे परावलंबित्व ॥
दिवसा जन्मावे, रात्री मरावे । हे चक्र अविरत चालत रहावे ॥८:१९॥
सर्व सृष्टि नाशी जरी । एक भाव राही तरी ॥
तो अविनाशी अव्यक्त । नसे अव्यक्त, किंवा व्यक्त ॥८:२०॥

अव्यक्त भावासी म्हणती । अक्षर किंवा परमगति ॥
तेथे असे माझी वस्ती । जिथून ज्ञानी न परतती ॥८:२१॥

समस्त भूते  असती, हे पार्थ । ज्या परमपुरुषामाजी स्थित ॥
तो व्यापुनी असे सकल भुवने । त्याची प्राप्ति केवळ भक्तीने ॥८:२२॥

ज्या समयी मृत्यु होता । योगी असे पुन्हा जन्मता ॥
व केव्हां तो न परतता । ते मी सांगेन तुज पार्था ॥८:२३॥

अग्नि, ज्योति, सूर्य दृश्यमान। शुक्लपक्ष तसेच उत्तरायण ॥
अशा समयी योगी मृत होई। तो ब्रह्मस्वरूपी विलीन होई ॥८:२४॥

धूर, रात्रि, कृष्णपक्ष असता। व दक्षिणायनी योगी मरता ॥
कांही काळ चंद्रलोकी जाई। मग परत फिरोनी जन्म घेई ॥८:२५॥

शुक्ल व कृष्ण हे असती। शाश्वत मार्ग या जगती ॥
एक चालता होई मुक्ति। दुजा आणी परत जगती ॥८:२६॥

हे दोन्ही मार्ग असती ज्ञात। ज्या योग्यासी व्यवस्थित॥
नसे भ्रम त्यासी किंचित। सदैव तू रहा योगी, पार्थ॥८:२७॥
यज्ञ, तप, दानाने जी प्राप्त। पुण्ये असती वेदात कथित॥
त्यांते लंघोनी  योगी जाई। आदिस्थानासी प्राप्त होई॥८:२८॥

**अध्याय ८ समाप्त**

# ॥ अध्याय ९ ॥

भगवान म्हणती पार्थासी । सांगेन ज्ञानविज्ञान तुजसी ॥
मुक्त होशील तू ते जाणून । मग या अशुभ प्रपंचातून ॥९:१॥
हे ज्ञान असे श्रेष्ठ, सर्वोत्तम । पवित्र, धर्मानुनयी, गुह्यतम ॥
थेट अनुभूति त्याची शक्य । ते अविनाशी सहजप्राप्य ॥९:२॥

अश्रद्ध जे आत्मज्ञाना ठायी । माझी प्राप्ति त्यांस न होई ॥
ते प्रपंचचक्रात अविरत फिरती । ज्यात जन्म मृत्यु अटळ असती ॥९:३॥
मी असे जरी अव्यक्त । मीचि केले जग व्याप्त ॥
सकल भूते मजमाजी । परि मी नसे त्यांमाजी ॥९:४॥
तरी नसती भूतेही मजमाजी । मी धारी भूते, नसे त्यांमाजी ॥
ममात्मा निर्मी, पोषी त्यांसी । जाण माझ्या योगसामर्थ्यासी ॥९:५॥

जसा वायु असे महान। वाहतो सर्वत्र समान॥
सदैव असे आकाशस्थ। भूते तशीच माझ्यात॥९:६॥
सृष्टीचा अंत होई जेव्हां। भूते विरून जाती तेव्हां॥
निर्मावयाचे असे सृष्टीसी। मी पुन्हा उपजवी भूतांसी॥९:७॥
माझी प्रकृति कार्यरत असे। जी पुन्हापुन्हा निर्मितसे॥
या भूतमात्रांसी समस्त। जे मात्र पराधीन असत॥९:८॥

मजसी न बांधती, हे पार्थ। ही कर्मे कदापिही किंचित ॥
त्यांप्रती उदासीन अलिप्त। मी असे निव्वळ साक्षीभूत ॥९:९॥
माझ्या निर्देशाने, कौन्तेया। चराचरासी प्रसवते माया ॥
म्हणोनी जग फिरते अविरत। निर्मिती, स्थिति व लयात ॥९:१०॥
मी धारण केले मानवदेहासी। म्हणूनी मूढ दुर्लक्षिती मजसी ॥
मी असे प्रत्यक्ष परमेश्वर जरी। अज्ञजन ते न ओळखती तरी ॥९:११॥

आशा, कर्मे, समस्त ज्ञान। मूर्खांचे असे व्यर्थ जाण॥
चित्त त्यांचे होय भ्रष्ट। आसुरी स्वभाव मोहित॥९:१२॥
मीचि असे भूतमात्रांचे कारण। ज्ञात त्यासी जे दैवी गुणसंपन्न॥
मी अविनाशी असे ते जाणती। मग एकनिष्ठेने मजसी पूजिती ॥९:१३॥
योगी गाती माझी कीर्ति। माझाच मार्ग अनुसरती॥
मजसी भक्तिभावे नमिती। माझ्याशी तदाकार होती॥ ९:१४॥

कोणी ज्ञानयज्ञाने पूजित असे । मी एकलाचि, अनेकही दिसे ॥
किती एक माझी रूपे असती । अन् सर्वत्र असे माझी वस्ती ॥९:१५॥

मी क्रतु, यज्ञ, स्वधा ॥ मीचि बनवी औषधा ॥
मी मंत्र, तसेच घृत । मीचि अग्नि, मी हुत ॥९:१६॥

मी जगताचा पिता, माता । मीचि धर्ताही, महापिता ॥
मी ज्ञेय, पवित्र, ओमकार । मी वेद साम, रुक्, यजुर्॥९:१७॥

मी भर्ता, प्रभु, आश्रयस्थान । साक्षी, गति व वसतिस्थान ॥
सुहृद, स्त्रोत, स्थिति, प्रलय । भांडार आणि बीज अव्यय ॥९:१८॥
मीचि सूर्य जो उष्णता देतो । मी पाऊस पाडतो, थांबवितो ॥
हे पार्थ, मी मृत्यु, अमृतही । मी सत्, तैसेचि असत्‌ही ॥९:१९॥
वेद जाणती ते सोमरस प्राशिती । पापरहित होती, यज्ञयाग करिती ॥
स्वर्गप्राप्तीसाठी मजसी प्रार्थिती । पुण्यफळ स्वर्गसुखाची त्यांसी प्राप्ति ॥९:२०॥

स्वर्गसुखे अगणित भोगिती। पुण्य सरता या लोकी परतती॥
स्वर्गासाठी वेदोक्त कर्मे करिती। जन्ममृत्युचक्री फिरत राहती॥९:२१॥

निरिच्छ भक्त मजसी स्मरती। एकनिष्ठेने मजसीच पूजिती॥
मजमाजी सदैव तल्लीन असती। त्यांचा योगक्षेम माझ्यावरती॥९:२२॥

जे जन पूजिती, हे कौन्तेय। श्रद्धापूर्वक देवतांसी अन्य॥
ती त्यांची पूजा मजसी प्राप्त। परि ती असे विधिरहित॥९:२३॥

मी भोगी व नियंती यज्ञांसी । भक्त भजती अन्य देवतांसी ॥
ते तत्त्वत: न जाणती मजसी । म्हणोनी मुकती यज्ञफळासी ॥९:२४॥
देवांसी पूजावे मग देवलोका जावे । पितरांसी पूजोनी पितृलोका जावे ॥
देवतांसी पूजोनी त्या लोका जावे । मजसी पूजोनी मजसी प्राप्त व्हावे ॥९:२५॥
पान असो वा फूल असो । फळ किंवा पाणीच असो ॥
भक्त जे अर्पी एकनिष्ठेने । ते मी स्वीकारी आनंदाने ॥९:२६॥

पार्था, जे तू करिसी, भक्षिसी। यज्ञात अर्पिसी, दान करिसी ॥
वा तप करिसी, ते ते सकळ। मजसी अर्पण करावे केवळ ॥९:२७॥
मग मुक्त होशील कर्मबंधनातुनी। सुटशील शुभाशुभ परिणामातुनी ॥
होउनी संन्यासयोग तुजसी प्राप्त। होशील मजमाजी विलीन, तू मुक्त ॥९:२८॥
मी असे सम सर्व भूतांप्रती। मित्र वा शत्रु मजसी नसती ॥
जे करिती निष्ठेने भक्ति माझी। तयामाजी मी व ते मजमाजी ॥९:२९॥

केली असती कर्मे निषिद्ध । मग जो मजसी भजी सश्रद्ध ॥
त्याचे असे धार्मिक मनोधैर्य । त्यासी साधु म्हणणेच योग्य ॥९:३०॥

मग तो शीघ्र धर्मात्मा होई । त्यासी चिरशांति प्राप्त होई ॥
अर्जुना, हे जाणावे तुवा स्पष्ट । माझा भक्त न कधी होई नष्ट ॥९:३१॥

असो जन्मले कसेही । स्त्रिया, वैश्य, शूद्रही ॥
आश्रय मजमाजी घेती । त्यांसी प्राप्त परमगति ॥९:३२॥

ब्राह्मण, राजर्षि पुण्यवान । ते माझ्या भक्तीत तल्लीन ॥
अशाश्वत जगती आलासी । ते दु:खकारक, भज मजसी ॥९:३३॥

तुवां चित्त मजठायी ठेवावे । व्हावे भक्त, मजसी भजावे ॥
नमस्कारावे, मजसी स्तवावे । मग मजमाजी विलीन व्हावे ॥९:३४॥

** अध्याय ९ समाप्त**

# ॥ अध्याय १० ॥

श्री भगवान म्हणती, हे पार्थ । पुन्हा ऐक माझा उपदेश श्रेष्ठ ॥
तू अससी प्रिय मित्र माझा । तुझे हित हा उद्देश माझा ॥१०:१॥
देव महर्षींना नसे ज्ञात । माझा काय असे स्त्रोत ॥
मजपासूनी ते उपजती । जे सृष्ट तिन्ही जगती ॥१०:२॥

मी अज, ईश्वर, शाश्वत। तत्त्व असे हे ज्यासी ज्ञात॥

त्याचा भ्रमनिरास होई। तो मनुष्य पापमुक्त होई॥१०:३॥

बुद्धि, ज्ञान, निर्मोह, क्षमा, तप, इंद्रियनिग्रह। सत्य, सुख, दु:ख, भय, अभय, मनोनिग्रह॥

उत्पत्ति, विनाश, समत्व, अहिंसा, समाधान।यश, अपयश, दान हे विकार मजपासून॥१०:४,५॥

प्राचीन मनु चार, महर्षि सात। मीच होते निर्मिले भूतकाळात॥

समस्त भूतमात्र या जगामधली। त्यांपासूनी असती जाण उपजली॥१०:६॥

जो जाणे हे वैभव माझे । आणि योगसामर्थ्य माझे ॥
तो भक्तियोगाने एकनिष्ठ । विलीन मजमाजी खचित ॥१०:७॥

मीचि असे सृष्टीचा स्त्रोत । मजपासूनी सुरु समस्त ॥
हे स्पष्टपणे ज्ञानी जाणती । भक्तिभावे मजसी पूजिती ॥१०:८॥

माझ्याच ठायी चित्त ठेविती । शरण येउनी मजसी स्तविती ॥
भक्त एकमेका बोध करिती । सदैव राहुनी संतुष्ट हर्षिती ॥१०:९॥

भक्त मजशी तद्रूप होती । ते प्रेमाने मजसी भजती ॥
मी देई बुद्धियोग त्यांसी । मग ते होती प्राप्त मजसी ॥१०:१०॥

त्यांची अनुकंपा येई मजसी । मी त्यांच्या हृदयात निवासी ॥
मग ज्ञानदीपाचा प्रकाश होई । अज्ञानांधकार त्यांचा नष्ट होई ॥१०:११॥

अर्जुन करी भगवंतांचे स्तवन । तुम्ही परमधाम परम ब्रह्मन ॥
अतिपवित्र, दिव्य, व शाश्वत । अजन्मा, महान, देवांचा स्त्रोत ॥१०:१२॥

देवर्षि नारदांनी, असितांनी । देवलांनी व व्यासादिकांनी ॥
हेच सांगितले होते मजसी । आणि तूही तेच सांगतसी ॥१०:१३॥
मग अर्जुन म्हणे केशवासी । जे तू सकल मजसी सांगसी ॥
ते सत्यचि हे मान्य मजसी । देवदानव न जाणती तुजसी ॥१०:१४॥
हे पुरुषोत्तमा, म्हणे धनुर्धर । तू अससी सृष्टिकर्ता परमेश्वर ॥
जगत्पति, भूतांसी नियमिसी । आत्मबलेची स्वत:सी जाणसी ॥१०:१५॥

ही सृष्टि व्यापूनी असती । तुझ्याच दिव्य विभूती ॥
त्याविषयी सांगावे मजला । असे म्हणे पार्थ भगवंताला ॥१०:१६॥
हे योगी, कैसे तुजसी स्मरावे । सांग, तुझे ध्यान कैसे करावे ॥
कितीक असती रूपे तुझी । चिंतावे कोणा तयामाजी? ॥१०:१७॥
हे जनार्दन, सांग फिरूनी एकवार । योग, तुझ्या विभूति तपशीलवार ॥
हे अनंता, न होई माझे समाधान । जरी ऐकिले तुझे बोल अमृतसमान ॥१०:१८॥

भगवान म्हणती पार्थासी । आता ऐक सांगेन तुजसी ॥
मी माझ्या मुख्य विभूति । ज्या एरव्ही अनंत असती ॥१०:१९॥
हे पार्थ, मी आत्मा तो असे । जो समस्त भूतामाजी वसे ॥
मी आहे आदि, मी मध्यही । मीचि सकल भूतांचा अंतही ॥१०:२०॥
बारा आदित्यांमाजी विष्णु मी । तेजस्वी वस्तूंमाजी सूर्यचि मी ॥
मरुद्गणांमाजी असे मरीचि मी । तैसेचि नक्षत्रांमाजी चंद्र मी ॥१०:२१॥

वेदांमध्ये सामवेद मी । देवांमध्ये जो इंद्र तो मी ॥
इंद्रियामाजी असे मन मी । सजीवामध्ये प्राण मी ॥१०:२२ ॥
रुद्रामध्ये शंकर मी । यक्षराक्षसामध्ये कुबेर मी ॥
अष्टवसूमध्ये अग्नि मी । पर्वतामध्ये मेरू मी ॥१०:२३॥
मुख्य पुरोहित ज्यासी म्हणती । हे पार्थ, तो मी असे बृहस्पति ॥
सेनानींमध्ये कार्तिकस्वामी मी । जलाशयांमाजी महासागर मी ॥१०:२४॥

सात महर्षींमध्ये भृगु मी । भाषांमाजी ओमकार मी ॥
यज्ञांमध्ये जपयज्ञ तो मी । स्थावरामाजी हिमालय मी ॥१०:२५॥
वृक्षामाजी अश्वत्थ मी । देवर्षींमध्ये नारद मी ॥
गंधर्वांत चित्ररथ मी । सिद्धां माजी कपिल मुनि मी ॥१०:२६॥
उच्चैश्रवा असे मी अश्वांमाजी । जो उपजला क्षीरसागरामाजी ॥
उत्तम हत्तींमध्ये ऐरावत मी । समस्त नरांमाजी नराधिप मी ॥१०:२७॥

आयुधांमाजी वज्र मी । धेनूंमध्ये कामधेनु मी ॥
प्रजनन हेतूंत कंदर्प मी । सर्पांमाजी वासुकि मी ॥१०:२८॥

नागांमाजी अनंत मी । जलदेवतांत वरुण मी ॥
पितरांत अर्यमा मी । नियंत्यांमध्ये यम मी ॥१०:२९॥

दैत्यांमाजी प्रल्हाद मी । सत्ताधीशात काल मी ॥
प्राण्यांमाजी सिंह मी । पक्ष्यांमध्ये गरुड मी ॥१०:३०॥

शुद्धिकर्त्यांमाजी पवन मी। शस्त्रधाऱ्यांमध्ये राम मी॥
जलचरांमाजी मगर मी। नद्यांमाजी भागीरथी मी॥१०:३१॥

सृष्टीचा आदि, अंत। तैसा मध्य मी पार्थ॥
विद्यांमध्ये अध्यात्म मी। वादांमध्ये तार्किकता मी॥१०:३२॥

अक्षरांमाजी ओमकार मी। समासांमाजी द्वंद्वसमास मी॥
चिरंतन काल तोही मी। निर्मात्यांमाजी ब्रह्मदेव मी॥१०:३३॥

सर्वभक्षी मृत्यु तो मी । सर्व सृष्टांचे दैवही मी ॥
मी स्त्रीलिंगी गुणांत लक्ष्मी, कीर्ति । वाणी, स्मृति, बुद्धि, धृति, शांति ॥१०:३४॥

सामवेदात बृहत्साम मी । छंदांमध्ये गायत्री मी ॥
महिन्यांत मार्गशीर्ष मी । ऋतूंमाजी वसंत तो मी ॥१०:३५॥

ठकांमाजी द्यूत मी । तेजस्व्यांचे तेज मी ॥
व्यवसायात विजय मी । सात्त्विकांमाजी सत्त्व मी ॥१०:३६॥

यादवांमाजी वासुदेव मी । पांडवांमध्ये अर्जुन मी ॥
मुनींमाजी व्यास मी । विचारवंतात उशन मी ॥१०:३७॥
शासनसाधनांमाजी दंड मी । विजिगीषूंमाजी नीति मी ॥
गुह्य गोष्टींमध्ये मौन मी । ज्ञान्यांमाजी ज्ञान मी ॥१०:३८॥
बीज जीवांचे समस्त । ते असे मीचि, हे पार्थ ॥
स्थावर वा जंगम एकही । नसे मजवाचूनी कदापिही ॥१०:३९॥

माझ्या दिव्य विभूति। जरी त्या अनंत असती॥
तरी सांगितल्या तुजसी। हे अर्जुना, उदाहरणासी॥१०:४०॥

असे जाण, हे पार्थ। जे जे दिसे श्रीमंत॥
नेत्रदीपक, प्रभावयुक्त। माझे तेज त्याचा स्त्रोत॥१०:४१॥

परि काय लाभ यापासूनी। हे अर्जुना, हे सर्व जाणूनी॥
तुवा इतुकेचि जाणावे केवळ। सृष्टिमात्र माझा अंश निव्वळ॥१०:४२॥

**अध्याय १० समाप्त**

# ॥ अध्याय ११ ॥

अर्जुन म्हणे श्रीकृष्णासी । तू मजवरी कृपा केलीसी ॥
वदिले गुह्य अध्यात्मज्ञान । मोह माझा गेला नाशून ॥११:१॥
उत्पत्ति लय तू विस्तारिले । हे भगवन्, मी असे ऐकिले ॥
तुझे माहात्म्य चिरंतन । हेही मी केले असे श्रवण ॥११:२॥

तू तुझ्याविषयी केले वर्णन । ते सत्यचि तैसे असे, भगवन् ॥
हे पुरुषोत्तमा, माझी कामना । घ्यावे तुझ्या विश्वरूपदर्शना ॥११:३॥

मी पाहण्या असे का समर्थ । तुजसी तसे वाटे निश्चित ॥
तर तुझे ते रूप अविनाशी । योगेश्वरा, दाखवावे मजसी ॥११:४॥

भगवान म्हणती -
माझी रूपे असती अगणित । प्रकार व रंग तयांचे अनंत ॥
किती एक आकार अद्भुत । ती दिव्य रूपे पहा हे पार्थ ॥११:५॥

पहा आदित्य, अश्विनी दोन ।  हे पार्थ, वसू ,रुद्र,  मरुद्गण ॥
कितीक रूपे दिव्य असती । पूर्वी जी तू पाहिली नसती ॥११:६॥

पहा एक स्थानी, हे पार्थ । मज शरीरामाजी स्थित ॥
समस्त विश्वचि चराचर । सर्व जे तू इच्छिसी इतर ॥११:७॥

परि तू हे न पाहू शकसी । चर्मचक्षू असमर्थ त्यासी ॥
देईन दिव्य चक्षू तुजसी । योगैश्वर्य माझे तू पाहसी ॥११:८॥

मग संजय म्हणाला, हे राजन् । असे वदले महायोगेश्वर कृष्ण ॥
दाखविले त्यानी अर्जुनासी । महान विश्वरूप ऐश्वर्यासी ॥११:९॥

वदने, नयन अनेक या विश्वरूपात । तैसीच असती अनेक दृश्ये अद्भुत ॥
आणि दैदीप्यमान आभूषणे अनेक । चमकदार शस्त्रे हातात उंच कितीक ॥११:१०॥

दिव्य फूलमाला व वस्त्रे नेसिली । सुगंधी द्रव्ये शरीरावरी लेपिली ॥
विश्वरूप देवाचे विस्मयकारक । ज्यासी मुखे चहूबाजूनी अनेक ॥११:११॥

जरी तेज सूर्यांचे सहस्र । पसरेल आकाशी एकत्र ॥
त्यासारिखे असे दृश्य । विश्वरूपतेजाचे दिव्य ॥११:१२॥
सृष्टि भासे अनेकविध जरी । अर्जुन पाही विश्वरूपी तरी ॥
समस्त दृश्य जग एकत्रित । तेव्हां परमेश्वरशरीरात ॥११:१३॥
मग अर्जुन झाला चकित । रोमांचित व पुलकित ॥
जोडोनी दोन्ही हातासी । असे म्हणे तो भगवंतासी ॥११:१४॥

हे देवा, दिसती तव शरीरी । ब्रह्मदेव बैसले कमळावरी ॥

समस्त मुनिगण आणि देव । सर्प दिव्य आणि सर्व जीव ॥११:१५॥

दिसती तुझे हात अनंत । उदरे, मुखे, नेत्र अगणित ॥

रूपे चहूबाजूंनी अनंत । न दिसे, आदि मध्यान्त ॥११:१६॥

हाती गदा, चक्र, मस्तकी मुकुट । तू तेजस्वी, चोहीकडूनी चमकत ॥

तेज तुझे सूर्यासम, न मोजावे । तुजसी कोठून मी कैसे पहावे?॥११:१७॥

तू परब्रह्म, म्हणती अक्षर ज्यासी। विश्वाचे परमनिधान, अविनाशी॥
तू सनातन धर्मासी रक्षिसी। वाटे तू अव्यय पुरुष असती॥११:१८॥

नसे तुज आदि, मध्य किंवा अंत। बल तुझे अपरिमित, बाहू अनंत॥
मुख अग्निसम, सूर्य, चंद्र हे डोळे। दिसते तुझ्या तेजाने विश्व त्रासले॥११:१९॥

हे महात्मन, तू व्यापुनी असती। पृथ्वी, आकाश, दाही दिशांसी॥
पाहूनी अद्भुत रूप हे भयानक। जाहले अतिव्यथित तिन्ही लोक॥ ११:२०॥

सुरगण तव रूपात प्रवेशती। भयाने हात जोडोनी प्रार्थिती॥

महर्षी व सिद्ध स्वस्ति म्हणती। आणि तुझी बहुत स्तुति करिती॥११:२१॥

आदित्य, वसू, विश्वदेव, रुद्र। मरुत, साध्य, अश्विनीकुमार॥

पितर, गंधर्व, यक्ष, सिद्ध चकित। तुझे विश्वरूप आहेत पाहात॥११:२२॥

महाबाहो, रूप तुझे विशाल अति। ज्यात मुखे, नेत्र, हात, उदरे किती॥

अनेक मांड्या, विक्राळ दात, पाय। मजसी तैसेचि लोकांसी वाटे भय॥११:२३॥

हे विष्णो, तू आकाश असे स्पर्शिले । तू तेजस्वी, बहुरंगी, मुख उघडले ॥
ऐसे रूप तुझे ज्यात नेत्र प्रज्वलित । मी भयभीत, धैर्यरहित व अशांत ॥११:२४॥
हे देवाधिदेव, तू व्यापुनी विश्व समस्त । पाहुनी तुझी भयकारक मुखे प्रज्वलित ॥
दात विक्राळ, न कळती दिशा किंचित । करावी कृपा मज वाटे अस्वस्थ ॥११:२५॥
पुत्र धृतराष्ट्राचे, राजे किती । भीष्म, द्रोण, कर्ण व सेनापति ॥
तुझ्या भयानक मुखी प्रवेशती । विक्राळ दातात शिरे चूर्ण होती ॥११:२६, २७॥

जसे नद्यांचे प्रवाह प्रचंड। धावती सागराकडे जलद॥
तसेच हे युधवीर समस्त। प्रवेशती ज्वलित मुखात॥११:२८॥
जसे पतंग जाती अग्नीत। अतिजलद स्वनाशाप्रत॥
तसे हे लोक सारे प्रवेशत। नष्ट होण्या तुझ्या मुखांत॥११:२९॥
विष्णो, मुखे तुझी प्रज्वलित। सर्व लोकांसी भक्षत आहेत॥
व असती जिभल्या चाटीत। तेज तीव्र तापवी जग समस्त॥११:३०॥

हे देवेश, मी प्रार्थितो तव कृपेसी । भयंकर रूपात कोण तू अससी ॥
इच्छितो तुझे ज्ञान सकलादि तू । मज न कळे किंचितही तुझा हेतु ॥११:३१॥

भगवान म्हणती -

मी काल सृष्टीसी नाशीन । म्हणती जीवांसी मारीन ॥
सैन्य ठाकले समोरासमोर । न वाचेल, राहशील तू मात्र ॥११:३२॥

अर्जुना, ऊठ व मिळव विजय । शत्रूंसी दमूनी उपभोग राज्य ॥
माझ्याकडून ते आधीच मृत । तू तर व्हावे मात्र निमित्त ॥११:३३॥

मी आधीच वधिले भीष्म, द्रोण । समस्त महारथी जयद्रथ, कर्ण ॥
तू त्यांसी मारावे, शोक नसावा । तू लढोनी त्यांचा नाश करावा ॥११:३४॥

संजय म्हणे, अर्जुनाने हे ऐकिले । मग शरीर त्याचे कापू लागले ॥
नमन करोनी तो श्रीकृष्णासी । विनम्रभावे असे म्हणे त्यासी ॥११:३५॥

हे हृषीकेशा, मग असे अर्जुन म्हणे । जग हे सारे हर्षित तुझ्या कीर्तीने ॥
असुर भयभीत, चोहीकडे धावती । हे योग्य सिद्ध तुला नमस्कारिती ॥११:३६॥

हे महात्मन्, देवाधिदेवा, अनंता । तू परमश्रेष्ठ व ब्रह्मदेवाचा निर्माता ॥

का न नमावे तुजसी समस्त जनांनी । तू सर्वव्यापी, अक्षर, सतसता लंघुनी ॥११:३७॥

तू आदिदेव, तू पुरुष प्राचीन । अससी विश्वाचे परमनिधान ॥

तुजसी जाणावे तू परमस्थान । हे अनंता, तू व्यापिले त्रिभुवन ॥११:३८॥

वायु, यम, अग्नि, चंद्र, वरुणाचा । कश्यपादि प्रजापती, ब्रह्मदेवाचा ॥

तू अससी प्रपिता, तुजसी नमितो । सहस्रवार, पुन: पुन्हा मी वंदितो ॥११:३९॥

हे सर्वव्यापी देवा, तुजसी समोरुनी । नमितो मागुनी तैसे समस्त बाजूनी ॥
तुझे शौर्य अनंत व बल असे अमित । सकल तुझी रूपे, तू व्यापिले समस्त ॥११:४०॥
तुझे माहात्म्य मजसी अज्ञात । मी समजत तुजसी सुहृत ॥
बोलिलो कधी उद्धट, यादवा । हे सख्या, कधी प्रेमापोटी वा ॥११:४१॥
खेळता, झोपता वा बैसता । जेविता, हे अच्युता, अनंता ॥
राखिले नसेल तुझ्या माना । तरी करा क्षमा, ही प्रार्थना ॥११:४२॥

चराचर सृष्टीचा पिता तू पूज्य । तू गुरु, सामर्थ्य तुझे अतुलनीय ॥
तुजसम तिन्ही जगती कोणी नसे । कोणी तुजसी वरचढ कैसा असे? ॥११:४३॥

म्हणून भगवन्, घालितो लोटांगण । प्रार्थी तुज, योग्य तू करण्या स्तवन ॥
साहावी पापे, जसा पिता पुत्राची । जसा मित्र मित्राची वा पति पत्नीची ॥११:४४॥

देवाधिदेवा, विश्वरूप पाहिले । मी हर्षित, पूर्वी नसे पाहिले ॥
झालो असे मी भयभीत । कृपेने यावे मनुष्यरूपात ॥११:४५॥

सहस्त्रबाहो, विश्वमूर्तिमंता। मजसी असे कामना आता॥
पहावे तुझे रूप मुकुटधारी। हाती गदा, असे चक्रधारी॥११:४६॥

भगवान म्हणाले -

हे अर्जुना, मी दाखविले आनंदाने। तुजसी माझ्या योगसामर्थ्याने॥
सर्वव्यापी, आद्य, अनंत रूप तेजस्वी। तुजवाचूनी कोणी न पाहिले पूर्वी॥११:४७॥

वेदाभ्यासाने नाही, यज्ञाने नाही। कर्माने, तपाने, दानधर्माने नाही॥
माझे विश्वरूप दर्शन जगी अशक्य। हे अर्जुना, तुलाच हा लाभ अलभ्य॥११:४८॥

हे अर्जुना, माझे हे रूप पाहून। तू न जावे भिऊन वा गोंधळून ॥
पहा हे माझे विश्वरूप फिरूनी । एकवार आनंदाने ध्यान देऊनी ॥११:४९॥

संजय म्हणाला -
भगवान वासुदेव असे बोलिले । मग अर्जुनासी पुन्हा दाखविले ॥
सौम्य स्वरूप नेहमीचे आपुले । भयभीत अर्जुनासी आश्वासिले ॥११:५०॥

अर्जुन म्हणाला जनार्दनासी । तुझ्या मानवी सौम्य रूपासी ॥
पाहून झालो मी स्वस्थचित्त । मनासी सामान्य स्थिति प्राप्त ॥११:५१॥

मग भगवान म्हणती अर्जुनासी । पाहिलेस माझ्या विश्वरूपासी ॥
जे पाहणे असे केवळ असंभव । देवांसी त्याची कामना सदैव ॥११:५२॥

अर्जुना, हे दर्शन तुला लाभले । यज्ञयागाने कोणा नाही झाले ॥
वेदाभ्यासानेही होणे नाही । तपाने वा दानानेही नाही ॥११:५३॥

सर्वस्वी मजसी शरण यावे । मजसी भजावे अनन्यभावे ॥
एकच मार्ग मजसी जाणण्या । मज पाहाण्या, मज मिळण्या ॥११:५४॥

जो भक्त कर्म करी मजसाठी । मीचि केवळ त्याच्यासाठी ॥
निर्मोही, निर्वैर सर्वभूतांप्रती । त्यासीच होईल माझी प्राप्ति ॥११:५५॥

**अध्याय ११ समाप्त**

# ॥ अध्याय १२ ॥

अर्जुन मग विचारी भगवंतासी। कोणी भजी तुझ्या सगुण रूपासी ॥
तर दुसरा कोणी निर्गुण रूपासी। दोहोमाजी समजले सत्य कोणासी? ॥१२:१॥
मग पार्थासी भगवान सांगती। चित्त स्थिर मजठायी ठेविती ॥
माझ्याशी तद्रूप सदैव राहती। भजती श्रद्धेने, ते योगी असती ॥१२:२॥

सर्वव्यापी, अव्यक्त, अदृश्य । अचल, अविनाशी, अचिंत्य ॥

अक्षरासी समभावे पूजिती । इंद्रिये दमूनी मज प्राप्तिती ॥१२:३, ४॥

शरीरधारी जीव असती । तरी अव्यक्तासी पूजिती ॥

त्यांसी क्लेश बहुत होती । मगचि होई परमप्राप्ति ॥१२:५॥

अंतिम ध्येय मज जाणिती । अर्पिती सर्व कर्मे मजप्रती ॥

एकरूप माझ्याशी होती । अनन्यभावे मज ध्याती ॥१२:६॥

चित्त माझे ठायी अर्पिती । मी तारी त्यांसी शीघ्रगति ॥
या संसारमहासागरातून । जो नाशवंत असे अर्जुन ॥१२:७॥

राखावे मन माझे ठायी । ठेवावी बुद्धि माझे ठायी ॥
मग मजमाजी तू वसत । असे जाण संशयातीत ॥१२:८॥

चित्त ठेवण्या माझे ठायी, पार्थ । जरी तू असरसी सर्वथा असमर्थ ॥
तरी चित्त ऐहिकातून काढावे । अन् स्मरावे मजसी भक्तिभावे ॥१२:९॥

अभ्यासाचे सामर्थ्य नसे तुज। तर मग करावे कर्म हेतु मज ॥
मजसाठी समस्त करशील। तेव्हांच ध्येयसिद्धि होईल ॥१२:१०॥
जर हेही नसे शक्य तुजसी। तू करावे नियंत्रित मनासी ॥
द्वैत त्यागुनी शरण ये मजसी। सोडावे समस्त कर्मफलासी ॥१२:११॥
ज्ञान असे अभ्यासाहुनी श्रेष्ठ। ध्यान ज्ञानाहुनी अधिक श्रेष्ठ ॥
फलत्याग ध्यानापरी उत्तम। शांति असे त्याचा परिणाम ॥१२:१२॥

न करी द्वेष कोणाचा । असे जो मित्र सर्वांचा ॥

सहृदय तसेच अलिप्त । समभाव सुखदु:खाप्रत ॥१२:१३॥

सदा समाधानी, स्थिरचित्त । निश्चयी, मन असे ताब्यात ॥

मनबुद्धि केली मजसी अर्पित । मजसी अतिप्रिय असा भक्त ॥१२:१४॥

ज्याचा नसे त्रास इतरांसी । कोणाचा न वाटे त्रास त्यासी ॥

सुख वा दु:ख, क्लेश वा भय । नसे ज्यास, तो मजसी प्रिय ॥१२:१५॥

जो साधक असे कामनारहित। दक्ष, अलिप्त आणि भयरहित॥
कर्मरत परि फलाशाविरहित। तो माझा असे अतिप्रिय भक्त॥१२:१६॥

नसे आनंद वा क्रोधभावना। नसे शोक वा किंचित कामना॥
त्यागी सकल शुभाशुभ कर्मांसी। राही भक्तिरत तो प्रिय मजसी॥१२:१७॥

शत्रु तसे मित्र ज्यासी समान। न करी भेद मान वा अपमान॥
शीतोष्ण, सुखदु:ख एक ज्याला। ज्याने सकल मोह असे त्यागिला॥१२:१८॥

स्तुति व निंदा ज्याला समान । जो अल्पसंतुष्ट व राखी मौन ॥
जो स्थिरबुद्धि, नसे गृहासक्त । तो मजसी प्रिय, जो भक्तिरत ॥१२:१९॥
तरी श्रद्धा मजठायी ठेवुनी । जे तल्लीन माझे अनुसंधानी ॥
धर्मामृत वर्णिलेले आदरिती । असे भक्त मजसी प्रिय अति ॥१२:२०॥

**अध्याय १२ समाप्त**

# ॥ अध्याय १३ ॥

भगवान म्हणाले अर्जुनासी। क्षेत्र म्हणती या शरीरासी॥
ज्यासी हे ज्ञात तो क्षेत्रज्ञ। असे म्हणती ज्ञानी तत्त्वज्ञ॥१३:१॥

क्षेत्रज्ञ मी समस्त क्षेत्रात। असे जाण यथार्थ, हे पार्थ॥
क्षेत्र व क्षेत्रज्ञ असणे ज्ञात। तेच श्रेष्ठ ज्ञान हे माझे मत॥१३:२॥

ऐक अर्जुना क्षेत्र म्हणजे काय। कसे ते व त्याचे विकार काय॥
सांगेन त्याचा प्रभाव काय। क्षेत्रज्ञ व त्याचे सामर्थ्य काय॥१३:३॥

हे ज्ञान वर्णिले ऋषीनी। किती विविध प्रकारांनी॥
सांगितले छंदामधून वेदात। आणि ब्रह्मसूत्रामध्ये निश्चित॥१३:४॥

महाभूते, अहंकार। तसेच बुद्धि, अक्षर॥
इंद्रिये असती दहा। व पांच विषय पहा॥१३:५॥

द्वेष, सुखदु:ख, कामना। संघात, धृति व चेतना॥
सर्व मिळूनी क्षेत्र बनत। तुजसी सांगितले संक्षिप्त॥१३:६॥
दंभ वा मानित्व ज्यास नसे। अहिंसा, शांति, आर्जव असे॥
करी आचार्योपासना, शुचिता। ठेवी आत्मनिग्रह आणि स्थिरता॥१३:७॥
विषयेच्छा ज्यास नसती। अहंकारासी जे त्यागिती॥
जन्म, मृत्यु तैसेचि क्लेश। वृद्धत्व यांस मानिती दोष॥१३:८॥

निर्मोही, अनासक्ति। पुत्रदारागृह यांप्रती॥
सदैव चित्ताची समता। इष्ट वा अनिष्टही घटता॥१३:९॥
मजशी राखोनी तद्रूपता। अद्वैतभावे मज भजता॥
एकांतात राहणे आवडे। व जनात राहणे नावडे॥१३:१०॥
अध्यात्मज्ञानी नित्य मग्न। तत्त्वज्ञानाने परम दर्शन॥
यास म्हणावे सर्व ज्ञान। या विपरीत ते अज्ञान॥१३:११॥

ज्ञेय काय मी सांगेन आता । होई मोक्षप्राप्ति जे जाणता ॥

अनादि, श्रेष्ठ ब्रह्म नसे सत् । न त्यासी म्हणावे असत् ॥१३:१२॥

ब्रह्माला हातपाय सर्व बाजूंनी । डोळे, डोकी, तोंडे चहू बाजूंनी ॥

चोहोबाजूस कान त्याने धारिले । समस्त चराचर त्याने व्यापिले ॥१३:१३॥

त्यासी विषयजाणीव समस्त । परि ते असे अलिप्त अनासक्त ॥

तेचि असे समस्ताचे अधिष्ठान । भोगी सकल गुणांसी तरी निर्गुण ॥१३:१४॥

चराचर भूतांत ब्रह्म वसे । त्यांचे बाहेरी तरी ते असे ॥
सूक्ष्मत्वाने ते अनाकलनीय । दूर तरी निकटही वास्तव्य ॥१३:१५॥
मुळात अविभक्त असे जरी । बिंबे अनेक भूतरूपी तरी ॥
ते ब्रह्म भूतांचा निर्माता । पोषणकर्ता, विनाशकर्ता ॥१३:१६॥
ब्रह्म प्रकाशमानांचा स्त्रोत । अंधकार नसे त्यास ज्ञात ॥
ज्ञान, ज्ञानध्येय, ज्ञेय असे । भूतमात्रांच्या हृदयी वसे ॥१३:१७॥

क्षेत्र व ज्ञान म्हणजे काय । वर्णिले संक्षिप्त तसेच ज्ञेय ॥

हे जाणोनी माझा भक्त । विलीन माझ्या भावात ॥१३:१८॥

उभय पुरुष व प्रकृति । जाण अनादि असती ॥

परि विकार व गुण । प्रकृतीपासून उत्पन्न ॥१३:१९॥

सृष्टीचा हेतु असे प्रकृति । कार्यकारण संबंधापाठी ॥

सुखदु:ख भोगा कारण । तो पुरुष असे जाण ॥१३:२०॥

पुरुष प्रकृतीमाजी स्थित । प्रकृतिजन्य गुण भोगीत ॥
असे कारण हा गुणसंबंध । जन्मास योनीत विविध ॥१३:२१॥

परमपुरुष साक्षी भर्ता । नियंता तसेच भोक्ता ॥
परमेश्वर त्यासी म्हणती । शरीरात त्याची वस्ती ॥१३:२२॥

जो जाणी परमात्म्यासी । ऐसे गुण व प्रकृति यांसी ॥
त्यासी नसे जन्म परत । जरी तो कर्मे करी प्राप्त ॥१३:२३॥

कोणी पाही अंतरात्म्यास । ध्यानधारणा करी सायास ॥
कोणी अवलंबी ज्ञानमार्ग । दुसरा कोणी धरी कर्ममार्ग ॥१३:२४॥
ज्यांस नसे ऐसे आत्मज्ञान । करिती श्रवण गुरुमुखातून ॥
आत्म्यासी भक्तीने पूजिती । जन्ममृत्यूचा सागर तरती ॥१३:२५॥
हे भरतकुलश्रेष्ठा, जाण असे । जे चराचर भूत तुजसी दिसे ॥
होत असे त्यांची निर्मिती । कारण क्षेत्र क्षेत्रज्ञ युती ॥१३:२६॥

समस्त क्षणभंगुर भूतांत । अविनाशी परमेश्वर वसत ॥
त्याची सर्वात सम वस्ती । हे जाणे तो ज्ञानी व्यक्ति ॥१३:२७॥

जो पाहात असे सर्वात । ईश्वरास समप्रमाणात ॥
तो न करी नाश आपुला । मग जाई परमगतीला ॥१३:२८॥

सकल कर्मे घडत असता । प्रकृतीच्या धर्माने सर्वथा ॥
म्हणून आत्मा नसे कर्ता । खरा ज्ञानी हे जाणता ॥१३:२९॥

परमेश्वर एकचि असे पाहात । विविध भूतामाजी समस्त ॥
जग ब्रह्माचा विस्तार हे ज्ञात । असे ज्यास तो ब्रह्मासी प्राप्त ॥१३:३०॥

हे पार्थ, अनादित्व, निर्गुणत्व । अव्यय असे हे परमात्मतत्त्व ॥
ते शरीरी वसे परि अलिप्त । न करत कांहीही किंचित ॥१३:३१॥

आकाश व्यापुनी समस्त । सूक्ष्म असे म्हणून अलिप्त ॥
तैसा आत्मा सर्वत्र स्थित । तरी राही सर्वथा अलिप्त ॥१३:३२॥

जसा सूर्य असे प्रकाशत । एकचि समस्त जगतात ॥
तसा क्षेत्रज्ञ शरीरांत । असत प्रकाश पाडत ॥१३:३३॥

क्षेत्र क्षेत्रज्ञ यातील भेदासी । प्रकृतीपासून भूतमुक्ति कैसी ॥
जे ज्ञानी हे जाणत असती । त्यांसी ब्रह्माची होई प्राप्ति ॥१३:३४॥

**अध्याय १३ समाप्त**

# ॥ अध्याय १४ ॥

भगवान म्हणाले सांगीन । ते श्रेष्ठ व अतिउत्तम ज्ञान ॥
ते जाणोनी होई प्राप्त । मुनिजनांसी सिद्धि श्रेष्ठ ॥१४:१॥
प्राप्त करोनी ते उत्तम ज्ञान । जे होती मजमाजी विलीन ॥
न त्यास जन्म उत्पत्तिसमयी । नसे विनाशही प्रलयसमयी ॥१४:२॥

प्रकृति गर्भाशय म्हणावी । गर्भ त्यात मी निपजवी ॥
त्यातून मी करी उत्पत्ति । सकल भूतांचि या जगती ॥१४:३॥

समस्त योनींमाजी, हे पार्थ । जी भूते उद्भवती अगणित ॥
प्रकृति असे त्यांचे अधिष्ठान । मीचि पिता बीजदाता जाण ॥१४:४॥

हे पार्थ, प्रकृतीचे गुण तीन । सत्त्व, रज आणि तम भिन्न ॥
तेची बद्ध करण्यासी कारण । आत्म्यासी, जो असे चिरंतन ॥१४:५॥

गुणांमाजी निर्दोष सत्त्वगुण। जो ज्ञानदायी करी कल्याण ॥
देतसे सुखजाणीव व ज्ञान। बांधून ठेवी आत्म्यास, हे अर्जुन ॥१४:६॥
अति आवड हा रजोगुण। तृष्णा मोह त्याचे कारण ॥
तो आत्म्यास बद्ध करी। कर्मप्रवृत्तीने या शरीरी ॥१४:७॥
अज्ञान उपजवी तमोगुणासी। भ्रमवी शरीरधारी आत्म्यासी ॥
दोष त्याचे दुर्लक्ष, झोप, आळस। त्यांनी बांधी देहासी आत्म्यास ॥१४:८॥

सत्त्व बांधी सुखाशी । रज बांधी कर्माशी ॥
तम झाकी ज्ञानासी । व टाळी कर्तव्यासी ॥१४:९॥

कधी सत्त्व प्रभावी रज तमावर । कधी रजाचा जोर सत्त्व तमावर ॥
कधी तम जिंकी सत्त्व रजासी । सांगती भगवान अर्जुनासी ॥१४:१०॥

जेव्हां ज्ञानप्रकाश पसरी । समस्त शरीरावयवावरी ॥
सत्त्वगुणप्रभावाचा समय । तेव्हां, असे जाण नि:संशय ॥१४:११॥

रज असे जोरात जेव्हां । लोभ, ऐहिकरस तेव्हां ॥

कर्मप्रवृत्ति, अतिवासना । पार्था, जाण दृश्य खुणा ॥१४:१२॥

विवेकनाश, आळस, निष्काळजी । मोह ही चिन्हे दृश्य मनुष्यामाजी ॥

त्या समयीची जेव्हां तम भारी । सत्त्वगुणावरी रजोगुणावरी ॥१४:१३॥

मृत्यु ठाकता सामोरी । असेल सत्त्वगुण भारी ॥

त्यासी होई सद्गति प्राप्त । ज्ञान्यांच्या उत्तम लोकात ॥१४:१४॥

रजोगुण मृत्युसमयी जिंकला। पुनर्जन्म कर्मासक्तात लाभला ॥
तमोगुणाचे जरी वर्चस्व असावे। तरी त्याने मूढयोनीत जन्मा यावे ॥१४:१५॥

म्हणती पुण्यकर्माचे फळ। निपजे सात्त्विक, निर्मळ ॥
दु:ख असे राजस कर्मफळ। अज्ञान तामस कर्माचे फळ ॥१४:१६॥

सत्त्वगुण नेई ज्ञानाप्रत। रजोगुण पाडी लोभात ॥
तमोगुणामुळे मोह भ्रांति। अज्ञान तसेच प्रमादवृत्ति ॥१४:१७॥

सत्त्वगुणी जाती स्वर्गलोकात ।  रजोगुणी जन्मती मर्त्यलोकात ॥

जे जन मृत्यु पावती तमोगुणात । ते पुन्हा जन्मती अधमयोनीत ॥१४:१८॥

गुणचि असती कर्ता सर्वथा । जाणोनी न जाणी अन्यथा ॥

त्यास असे ज्ञात तो गुणातीत । तो होई मज स्वरूपासी प्राप्त ॥१४:१९॥

त्रिगुण उद्भवती शरीरापासून । जीवात्मा जरी जाई ते लंघून ॥

जन्म, मृत्यु, जरा दु:खकारक । त्यातून लाभे मुक्ति मोक्षदायक ॥१४:२०॥

मग पार्थ विचारी भगवंतासी । कसे ओळखावे जीवात्म्यासी ॥
लंघूनी तीन गुणांसी जो जाय । त्याची चिन्हे काय, कसे साध्य ॥१४:२१॥
मग भगवंत म्हणती हे अर्जुना । ज्यासी नसे ज्ञानाची कामना ॥
अज्ञानाचा तिरस्कारही नसे । मनोवृत्ति सम दोहीप्रती असे ॥१४:२२॥
असे उदासीन, गुणातीत । सदैव राही स्वस्थचित्त ॥
गुण असती कर्ता मानीत । तो राही सर्वथा निवांत ॥१४:२३॥

सुख व दु:ख ज्यासी समान। जो आत्मस्वरूपी दृढ असून ॥
दगडमाती, सुवर्ण त्यास अभिन्न। प्रियाप्रिय, स्तुतिनिंदा समान ॥१४:२४॥
ज्यास अभिन्न मानापमान। मित्र तसेच शत्रु हे समान ॥
न आरंभी कर्म किंचित। त्यासी म्हणावे गुणातीत ॥१४:२५॥
भजी मजसी निष्ठापूर्वक। जो न ठेवी कामना ऐहिक ॥
तो होई गुणातीत खचित। होई ब्रह्मस्वरूपास प्राप्त ॥१४:२६॥

मी वसतिस्थान त्याचे । अमृत, अव्यय ब्रह्माचे ॥
तसेच सनातन धर्माचे । व अनंत परमानंदाचे ॥१४:२७॥

**अध्याय १४ समाप्त**

# ॥ अध्याय १५ ॥

भगवान म्हणाले -

हा अश्वत्थवृक्ष अव्यय म्हणवी । फांद्या खाली मुळे वर असावी ॥
वेद या वृक्षाची पाने असती । हे जाणी त्यास ज्ञानी म्हणती ॥१५:१॥

शाखा वरखाली त्रिगुणांनी पोसिल्या । इंद्रियांचे विषय जणू कोमल कळ्या ॥
कर्मरूपी मुळे खाली वाढत राहती । तेच मनुष्यलोकी कर्मबंधन म्हणती ॥१५:२॥

जसे मी वर्णिले या अश्वत्थासी । तसा तो न येई जगी अनुभवासी ॥
आदि, स्थिति, विनाश नसे त्यासी । वैराग्यशस्त्र समर्थ छेदण्या त्यासी ॥१५:३॥
मग शोधावे त्याचि स्थाना । जेथून न परतावे लागे जना ॥
पुराणपुरुषाप्रती शरणागति । जेथून उगमे अनादि प्रवृत्ति ॥१५:४॥
निर्मोही, विषयवासनारहित । आत्मस्वरूपरत, कामनारहित ॥
द्वैतापासून मुक्त असे ज्ञानीजन । त्यांसी प्राप्त होई अव्यय स्थान ॥१५:५॥

सूर्य, चंद्र व अग्निही व्यर्थ। असती प्रकाशण्या असमर्थ॥
असे माझे अतिउत्तम स्थान। ते प्राप्त होता न परतती जन॥१५:६॥

माझा अंश जीवात्मा स्वरूपात। या मनुष्यलोकात होतो प्रतीत॥
इंद्रिये व मन त्यासी बांधिती। म्हणून असे तो त्रस्त जगती॥१५:७॥

जीव सोडी शरीर मृत्युपश्चात। मग प्रवेशी नवीन शरीरात॥
नेई मन, इंद्रिये सहा सोबत। जसा सुगंध जाई वाऱ्यासंगत॥१५:८॥

नेत्र, त्वचा, कान । जीभ, नाक व मन ॥
ही इंद्रिये जीवासाठी । विषय भोगण्यासाठी ॥१५:९॥
जीवात्मा अशरीर वा शरीरात । त्रिगुणांमुळे असे सुखदु:ख भोगत ॥
परि न जाणती अज्ञानी त्यासी । दिसे मात्र ज्ञानचक्षूंनी ज्ञान्यांसी ॥१५:१०॥
जे योगी सतत प्रयत्न करती । आत्म्यासी शरीरी पाहाती ॥
जरी चित्त नसे शुद्ध त्यांचे । मग यत्न व्यर्थ जाती त्यांचे ॥१५:११॥

सूर्य जगासी प्रकाशित असे । जाण ते तेज माझेच असे ॥
जे तेज अग्नीमाजी दिसे । चंद्रातही, ते माझे असे ॥१५:१२॥

मी पृथ्वीमाजी प्रवेशी । पेलवी समस्त जीवांसी ॥
रसमय चंद्र मीचि असे । औषधींचे पोषण होतसे ॥१५:१३॥

सजीव शरीरी प्रवेशूनी । मी होई वैश्वानर अग्नि ॥
मिसळी प्राण तसे अपान । चार अन्नांचे करी पचन ॥१५:१४॥

सकलांच्या हृदयी माझे अधिष्ठान । मजकारणे स्मृतिविस्मृति, ज्ञान ॥
मीचि निर्मिले सकल वेदांतासी । अर्थही त्याचा असे ज्ञात मजसी ॥१५:१५॥

या लोकी फक्त दोन पुरुष असती । एक क्षर दुसऱ्यास अक्षर म्हणती ॥
समस्त सृष्ट जीव क्षर म्हणविती । मात्र जीवात्म्यासी अक्षर म्हणती ॥१५:१६॥

उत्तम पुरुष असे एक वेगळा । परमात्मा असे म्हणती त्याला ॥
तीन जगतात तो करूनी प्रवेश । देतसे आधार व पोषण त्यांस ॥१५:१७॥

पलिकडे क्षराच्या मी । अक्षराहूनी उत्तम मी ॥
म्हणून मजसी म्हणती । पुरुषोत्तम वेदात जगती ॥१५:१८॥

उत्तम पुरुष मीचि असे । ज्यांच्या मनी शंका नसे ॥
तेचि खरे ज्ञानी असती । सर्वथा मजसी भजती ॥१५:१९॥

हे पार्थ मी सांगितले शास्त्र । वास्तविक अति गुह्य मात्र ॥
जे होता मनुष्यासी प्राप्त । होईल कृतकृत्य बुद्धिमंत ॥१५:२०॥

**अध्याय १५ समाप्त**

# ॥ अध्याय १६ ॥

मग भगवान पार्थासी म्हणती । अभय, तप, सत्त्व, योगस्थिती ॥
संशुद्धि, यज्ञ, दम, तप, ज्ञान । तसेच स्वाध्याय, आर्जव, दान ॥१६:१॥
वासनात्याग, सत्यवचन । अहिंसा, अक्रोध, अपैशुन ॥
मार्दव, ऱ्ही, व शांतता । दया, त्याग, स्वस्थता ॥१६:२॥

तेज, क्षमा, धृति, हे पार्था । अद्रोह, अमानित्व, शुचिता ॥
मनुष्याची ही लक्षणे असती । ज्यासी लाभली दैवी संपत्ति ॥१६:३॥
दंभ, दर्प, अभिमान । क्रोध, पारुष्य, अज्ञान ॥
ही सर्व लक्षणे असती । ज्याची आसुरी संपत्ति ॥१६:४॥
दैवी संपत्ति मुक्तिकारण । आसुरी तरी बंधनकारण ॥
तुझा जन्म दैवी संपत्तीत । न करावा शोक, हे पार्थ ॥१६:५॥

जगात लोकांची वर्गवारी । असती दैवी वा आसुरी ॥
मी आधी वर्णिले दैवीसी । ऐक आता वर्णी आसुरीसी ॥१६:६॥
न जाणे भेद आसुरी वृत्ति । काय प्रवृत्ति अन् निवृत्ति ॥
शौच व योग्य आचार नसे । सत्याची चाड त्यास नसे ॥१६:७॥
हे जग खोटे, ते म्हणती । धर्म अधर्म देव नसती ॥
कामवासनेतून उपजले । यासी नसे कारण वेगळे ॥१६:८॥

असे मानुनी मार्गभ्रष्ट होती । अल्पबुद्धि दुष्कर्मे करिती ॥
विनाशास कारण असती । असे जगत्शत्रु म्हणविती ॥१६:९॥

अमर्याद कामना, मान । दंभ, मोह, मद हे दुर्गुण ॥
असत् त्यांस आकर्षित । अशौच हेच त्यांचे व्रत ॥१६:१०॥

अति चिंता करी ग्रस्त । न सोडी अखेरपर्यंत ॥
कामभोगरत राहती । ध्येय एक वासनापूर्ति ॥१६:११॥

बद्ध असती आशापाशांनी अनेक। त्यांसी ग्रासिती कामक्रोधादिक॥
मग ते इच्छिती कामवासनापूर्ति। अन्याय्य मार्ग प्रसंगी अवलंबिती॥१६:१२॥

आज मजला झाले हे प्राप्त। उद्या करीन ही वासना तृप्त॥
आज एवढी संपत्ति असत। वाढेल आणिक भविष्यात॥१६:१३॥

मी वधिले असे या शत्रूसी। आता मी वधीन इतरांसी॥
मीचि ईश्वर, भोगीही मी। सिद्ध, बलवान, सुखी मी॥१६:१४॥

मी आहे श्रीमंत, उच्चकुलीन। जगी कोणी नसे मजसमान॥
करीन आनंदे यज्ञयाग दान। अशा भ्रमात अज्ञानी जन॥१६:१५॥
कितीक कल्पनांनी भ्रष्ट। ते अडकती मोहजालात॥
कामवासनांनी आसक्त। जाती अपवित्र नरकात॥१६:१६॥
दुराग्रही आत्मस्तुतिरत। ते धनमानाने मदमस्त॥
ढोंग यज्ञयागाचे करीत। परि ते असे विधिरहित॥१६:१७॥

अहंकार बल दर्प कामक्रोधादिक । यांनी ग्रस्त असती आसुरी लोक ॥
ते निंदिती मजसी जो असे वसत । त्यांच्या आणि दुसऱ्या शरीरात ॥१६:१८॥

अधम क्रूर या जगती । इतरांचा द्वेष करिती ॥
त्या दुष्टांसी मी फेकीत । पुन:पुन्हा आसुरी योनीत ॥१६:१९॥

जन्मोजन्मी आसुरी योनीत । अज्ञानी अधिकाधिक होत ॥
मग माझी प्राप्ति नसे त्यांस । पार्था, ते जाती अधमगतीस ॥१६:२०॥

काम, क्रोध व लोभ हे तीन । असती आत्मनाशासी कारण ॥
ही तीन द्वारे नेती नरकासी । म्हणून त्यजावे या तिन्हीसी ॥१६:२१॥
ही तीन द्वारे नेती अंधाराप्रती । ज्यासी मिळे त्यापासून मुक्ति ॥
आपल्या हितास्तव ते झटती । त्यांसी प्राप्त होई परमगति ॥१६:२२॥
प्रेरित होती कामवासनेने । जे दुर्लक्षिती शास्त्रवचने ॥
त्यांसी न होई सिद्धिप्राप्ति । नसे सुखलाभ वा परमगति ॥१६:२३॥

काय कर्म योग्य अयोग्य । यासाठी शास्त्रांचा न्याय ॥
योग्य कर्म शास्त्रप्रमाणित । तेचि जाणून करावे, पार्थ ॥१६:२४॥

**अध्याय १६ समाप्त**

# ॥ अध्याय १७ ॥

मग अर्जुन विचारी कृष्णासी । शास्त्राधार नसे ज्या भक्तिसी ॥
असे श्रद्धा मात्र पूर्ण तिच्यात । म्हणावी कोणत्या गुणाधिष्ठित? ॥१७:१॥
अर्जुनासी सांगती भगवान । श्रद्धेचे प्रकार असती तीन ॥
सात्त्विक, राजस व तामस । ऐक आता मी वर्णीन त्यांस ॥१७:२॥

प्रत्येकाचा स्वभाव आपुला । श्रद्धा लाभे तशीच त्याला ॥
ज्याची श्रद्धा जशी असेल । तसाच तो मनुष्य असेल ॥१७:३॥
सत्त्वगुणी पूजिती देवांसी । रजोगुणी यक्षराक्षसांसी ॥
इतर जे तमोगुणी असती । ते तर भूतप्रेतांसी पूजिती ॥१७:४॥
दंभ अहंकार यांनी ग्रस्त । वासना आसक्तीने प्रेरित ॥
ते जन घोर तप करिती । नसे ज्यास शास्त्रसंमति ॥१७:५॥

कष्टविती आपुल्या शरीरासी । तसेच अंत:स्थ जो मी त्यासी ॥
असे वागती जे जन अविचारी । वृत्ति त्यांची समजावी आसुरी ॥१७:६॥
सकलांसी प्रिय असे अन्न । त्याचे प्रकार असती तीन ॥
तसेच यज्ञ, तप अन् दान । यांचे असती प्रकार तीन ॥१७:७॥
अन्न जे प्रिय जनांसी सात्त्विक । उत्साह, सुख, आरोग्यदायक ॥
जे वाढवी आयुष्य आणि बळ । असे ते स्निग्ध, पौष्टिक, रसाळ ॥१७:८॥

रजोगुणी लोकांसी आवडे । अन्न जे कडू, आंबट, कोरडे ॥
तिखट, दाहक, दु:खदायक । ते असे विविध रोगकारक ॥१७:९॥
अन्न अर्धकच्चे, चवरहित । जे अपवित्र आणि दूषित ॥
नासके, शिळे आणि उष्टे । तमोगुणी जनांस प्रिय वाटे ॥१७:१०॥
सात्त्विक यज्ञ त्यासी म्हणती । ज्यास कर्तव्य कर्म समजती ॥
फलाशाविरहित शास्त्रविहित । करिती मनोधैर्यासहित ॥१७:११॥

हे अर्जुना, असे तू जाणावे । राजस यज्ञ त्यासी म्हणावे ॥
केला फलाशा मनी धरूनी । आणि दंभभावना ठेवूनी ॥१७:१२॥

जो यज्ञ केला असे विधीहीन । न दिले त्यात लोकांसी अन्न ॥
ब्राह्मणांसी दक्षिणा न देत । तो तामस यज्ञ श्रद्धारहित ॥१७:१३॥

देव, ब्राह्मण, गुरु, ज्ञानी पूजावे । शौच, आर्जव, ब्रह्मचर्य पाळावे ॥
अहिंसा व्रत ते अखंड सांभाळावे । त्यास पार्था, शारीर तप म्हणावे ॥१७:१४॥

दुसऱ्यास न दुखविता जे बोलावे। तरी ते सत्य आणि प्रियही असावे॥
भाषण व्हावे दुसऱ्यासी हितकारक। करावा वेदाभ्यास तेच तप वाचिक ॥१७:१५॥

सौम्यता, आनंदी मन। निग्रह, मनशुद्धि, मौन ॥
मनासी सदैव असे ठेवावे। तप मानसिक ते म्हणावे ॥१७:१६॥

नसे फलाशा मनी किंचित। जे असती समाधानी सतत ॥
त्रिविध तप केले श्रद्धापूर्वक। त्यासी म्हणावे तप सात्त्विक ॥१७:१७॥

कांक्षा आपुल्याच सन्मानाची। बाळगूनी स्तुतीची वा पूजेची॥

अथवा ढोंगीपणाने तप जे केले। अस्थिर त्यासी राजसिक म्हटले॥१७:१८॥

मूर्खपणाची दुराग्रही वृत्ति। आपुल्याच शरीरासी कष्टविती॥

दुसऱ्याचा नाश व्हावा या हेतूने। केले जे तप ते तामसिक म्हणणे॥१७:१९॥

कर्तव्य जाणोनी पवित्र स्थळी। दान सत्पात्रासी मंगल काळी॥

जो न करील फेड दानाची परत। ते दान म्हणावे सात्त्विक, हे पार्थ॥१७:२०॥

फळप्राप्तीच्या आशेने । प्रत्युपकाराच्या हेतूने ॥

दान जे केले अनिच्छेने । त्यास राजसिक म्हणणे ॥१७:२१॥

अनादराने, अयोग्य स्थानी । अवेळी, पात्रता न जाणोनी ॥

अपमानासह दान जे करणे । खचित ते तामसिक म्हणणे ॥१७:२२॥

नामे ही ओम, तत्, सत् । असती ब्रह्मन्‌ची निश्चित ॥

त्यांनी निर्मिले ब्राह्मण । वेद, यज्ञ काळी प्राचीन ॥१७:२३॥

म्हणून जे जन वेदांसी जाणती । यज्ञ, दान, तप प्रारंभ करिती ॥
ओमकार उच्चारीत विधियुक्त । जसे सांगितले ते वेदवाक्यात ॥१७:२४॥

ज्यांसी नसे फळाची इच्छा । मोक्षाचीच मात्र असे वांछा ॥
ते जन उच्चारिती शब्द तत् । असता दान, तप, यज्ञ करीत ॥१७:२५॥

शाश्वताचे स्मरण ठेवूनी । पवित्र भाव धरूनी मनी ॥
सत् शब्दासी उच्चारिती । प्रशस्त कर्मास सत् म्हणती ॥१७:२६॥

यज्ञ, दान, तप यात व्यस्त। त्यासी सुद्धा म्हणती सत्॥
कर्म असे केले त्याप्रीत्यर्थ। त्यासी सुद्धा म्हणावे सत्॥१७:२७॥

यज्ञ, दान, तप, कर्म, पार्थ। केले जे श्रद्धेविना ते असत्॥
त्याचे फळही न होई प्राप्त। इहलोकी किंवा परलोकात॥१७:२८॥

**अध्याय १७ समाप्त**

# ॥ अध्याय १८ ॥

मग अर्जुन म्हणे श्रीकृष्णासी । संन्यास व त्यागातील भेदासी ॥
जाणावे ही इच्छा मज मानसी । तू सांगावे स्पष्ट करून मजसी ॥१८:१॥

भगवान म्हणती -

काम्य कर्मांच्या त्यागास । ज्ञानीजन म्हणती संन्यास ॥
त्याग म्हणजे कर्मे सकळ । करावी त्यागोनी कर्मफळ ॥१८:२॥

कर्म त्याज्य दोषवत् म्हणून । असे म्हणती कोणी विद्वज्जन ॥
न त्यागावे यज्ञ, दान, तपकर्म । हे दुसऱ्यांच्या उपदेशाचे मर्म ॥१८:३॥
त्याग म्हणजे काय, हे पार्थ । आता ऐक माझे निश्चित मत ॥
त्यागाचे प्रकार असती तीन । ते तू स्पष्ट जाणावे, हे अर्जुन ॥१८:४॥
यज्ञ, दान, तप न सोडणे । कर्मे ही निश्चितच करणे ॥
त्याने चित्त शुद्ध होईल । जर फळ त्यागिले असेल ॥१८:५॥

कर्मे करावी खचित, पार्थ। मन असावे फलाशारहित ॥
नसावी कर्तेपणाची भावना। माझे उत्तम दृढ मत जाणा ॥१८:६॥

नित्य नैमित्तिक कर्मे करणे। अयोग्य त्यांचा त्याग करणे ॥
जरी कोणी सोडील त्यांसी। तो त्याग म्हणावा तामसी ॥१८:७॥

कर्मे दु:खकारक असे जाणूनी। शरीरास क्लेशकारक मानूनी ॥
ती सोडावी तो त्याग राजसिक। असा त्याग न होई लाभदायक ॥१८:८॥

नियत कर्मे कर्तव्य जाणूनी । करावी त्यांचे फळ त्यागूनी ॥
मोहाचाही त्याग जो करील । तो त्याग सात्त्विक म्हणवील ॥१८:९॥

काम्य कर्मांचा द्वेष न करावा । आणि सत्कर्मांचा मोह नसावा ॥
बुद्धिमान मनुष्य तो शुद्धचित्त । नसे संशय त्याचे मनी तो मुक्त ॥१८:१०॥

ज्याने धारिले असे देहासी । असमर्थ कर्मे त्यागण्यासी ॥
पण जो त्यागी कर्मफळासी । खरा त्यागी म्हणावे त्यासी ॥१८:११॥

अनिष्ट तसे इष्ट असे मिश्रफळ । मृत्युपश्चात त्यास त्रिविध फळ ॥
जो न करी कर्मफलाचा त्याग । परि संन्याशासी नसे तो भोग ॥१८:१२॥

पांच कारणे कर्मसिद्धीसाठी । जी सांख्य तत्त्वज्ञ सांगताती ॥
तसे कर्म कसे निष्प्रभ करावे । हे समस्त मजकडून ऐकावे ॥१८:१३॥

शरीर असे अधिष्ठान । कर्ता, ज्ञानेंद्रिये, प्राण ॥
इंद्रियदेवता, हे अर्जुन । ही पांच कर्माचे कारण ॥१८:१४॥

मनुष्य करी कर्मे, अर्जुन । काया, वाचा मनेकरून ॥
न्याय्य अन्याय्य असती । त्यांचा हेतु ही पांच होती ॥१८:१५॥

जो तरीही असे मानूनी । आत्म्याची सकल करणी ॥
त्याची अशुद्ध असे मति । त्यासी जाणावे मूर्खमति ॥१८:१६॥

नसे कर्ताभाव किंचित । बुद्धि ज्याची अलिप्त ॥
जरी वधी लोक समस्त । कर्मे त्यासी न बांधीत ॥१८:१७॥

ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान । कर्मासी प्रेरिती ही तीन ॥

कर्म, कर्ता, इंद्रिये समस्त । तो कर्मसंग्रह ज्ञानी म्हणत ॥१८:१८॥

असे सांगती सांख्य तत्त्वज्ञ । ज्ञान कर्म कर्ता प्रकार भिन्न ॥

त्यांसी असे आधार गुण तीन । ऐक अर्जुना आता मजकडून ॥१८:१९॥

त्या ज्ञानासी जाण सात्त्विक । जे पाहात अव्यय भाव एक ॥

न जाणी भेदाभेद किंचित । जगतातील समस्त भूतात ॥१८:२०॥

नाना भूतांमाजी अगणित । ज्यास होई भिन्नत्व प्रतीत ॥
ते ज्ञान राजसिक खचित । असे जाणावे तू, हे पार्थ ॥१८:२१॥

ते ज्ञान म्हणावे तामसी । जे असमर्थ पाहण्यासी ॥
शरीर वा मूर्तिपलिकडे । जे अयोग्य थिल्लर थोडे ॥१८:२२॥

जे कर्म करावे फलाशेविरहित । कर्तेपणाचा भाव न बाळगीत ॥
आसक्ति वा तिरस्कार नसावे । सात्त्विक कर्म त्यास म्हणावे ॥१८:२३॥

त्या कर्मास राजस म्हणत । जे केले असे फलाशासहित ॥
मी कर्ता हा भाव बाळगुनी । जे केले अति आयास घेउनी ॥१८:२४॥
कर्म ते तामसिक म्हणवीत । केले अज्ञानात दूरदृष्टिरहित ॥
नुकसानीची पर्वा न करता । स्वत:चे सामर्थ्य न जाणता ॥१८:२५॥
अनासक्त, अहंभावरहित । धैर्य व उत्साह यांनी युक्त ॥
कर्मफळाची न करी चिंता । म्हणवी तो सात्त्विक कर्ता ॥१८:२६॥

लोभी व विषयवासनायुक्त । पीडादायक, फलाशासहित ॥
अपवित्र व हर्षशोकान्वित । राजसिक कर्ता तो म्हणवीत ॥१८:२७॥

मूर्ख, कारस्थानी, उद्धट । आळशी, उदास व चेंगट ॥
हेवा करी जो विषयलंपट । त्यास तामस कर्ता म्हणत ॥१८:२८॥

आता सांगीन मी तुजला । तीन गुणांवर भेद केला ॥
बुद्धि धैर्यांचे तीन प्रकार । ते ऐक, हे पार्थ सविस्तर ॥१८:२९॥

प्रवृत्ति, निवृत्ति, योग्यायोग्य । तसेच भय काय अभय काय ॥
बंध कशामुळे कशी मोक्षप्राप्ति । हे जाणे जी बुद्धि सात्त्विक ती ॥१८:३०॥

धर्माधर्मातील भेद अज्ञात । काय करणे उचित अनुचित ॥
हे नसे ज्या बुद्धीस माहीत । ती राजसिक बुद्धि म्हणवीत ॥१८:३१॥

जी अधर्मासी धर्म मानी । जी झाकिली तमोगुणानी ॥
जी अर्थाचा अनर्थ करीत । ती बुद्धि तामसी म्हणवीत ॥१८:३२॥

ठेवी मनुष्या समाधिस्थितीत । सकल कर्मे करवीत, हे पार्थ ॥
वापरूनी  मन, इंद्रिये, प्राण । असे ते सात्त्विक धैर्य हे जाण ॥१८:३३॥

त्या धैर्यास म्हणती राजस । जे मनी ठेवी फळाची आस ॥
तीन पुरुषार्थांची कामना । धर्म अर्थ काम मोक्षाविना ॥१८:३४॥

निद्रा भय मद । शोक व विषाद ॥
दृढ धरी जे यास । धैर्य ते असे तामस ॥१८:३५॥

जीवात्मा लागे सुखापाठी । दु:खाचा अंत होण्यासाठी ॥
त्या सुखाचे प्रकार तीन । ऐक मजकडून, हे अर्जुन ॥१८:३६॥
सुख आधी होय विषसमान । पण परिणामी अमृतसमान ॥
आत्मविचार उपजवी ज्यास । सात्त्विक सुख म्हणती त्यास ॥१८:३७॥
इंद्रिये विषयांसी स्पर्शिती । होई तेव्हां राजस सुखप्राप्ति ॥
जे आधी वाटे अमृतसमान । परि अंती होई विषसमान ॥१८:३८॥

आधी तसेच अंतीही । मनास गुंतवती मोही ॥
प्रमाद निद्रा आळस । ते सुख म्हणवी तामस ॥१८:३९॥

या पृथ्वीवर मनुष्यांमाजी । तसेच स्वर्गातही देवांमाजी ॥
न कोणी मुक्त त्रिगुणांपासून । जे उपजले प्रकृतीपासून ॥१८:४०॥

ब्राह्मण व क्षत्रिय । शूद्र आणि वैश्य ॥
यांची कर्मे भिन्न । केली गुणांनी तीन ॥१८:४१॥

शौच, आर्जव, तप, ज्ञान । धीर, दम, शम, विज्ञान ॥
आस्तिक्य कर्मे सकळिक । ब्राह्मणाची स्वाभाविक ॥१८:४२॥

शौर्य, तेज, धृति, तसे दान । दाक्ष्य, लढणे पाय रोवून ॥
ईश्वरभाव ही कर्मे सकळिक । क्षत्रियाची जाण स्वाभाविक ॥१८:४३॥

कृषि, व्यापार व गोपालन । स्वाभाविक वैश्यकर्म जाण ॥
शूद्रासी कर्म सेवा करणे । तेचि स्वाभाविक जाणणे ॥१८:४४॥

आपुल्या नियत कर्मात रत । राही जो त्यास सिद्धि प्राप्त ॥
हे कसे साधावे ती पद्धत । आता मजकडून ऐक, पार्थ ॥१८:४५॥
सर्वव्यापी ईश्वरसत्तेखाली । भूतांची कार्ये सर्व चालली ॥
त्याची पूजा स्वकर्मांनी करणे । मग मनुष्यास सिद्धि प्राप्त होणे ॥१८:४६॥
जरी स्वधर्म वाटे कठीण । श्रेष्ठ तो सुलभ परधर्माहून ॥
मनुष्य स्वकर्म आचरीत । त्यास न लागे पाप किंचित ॥१८:४७॥

स्वाभाविक कर्म जरी सदोष । न त्यागावे कदापि त्यास ॥

धूर अग्नीसी झाके जसा । सर्व कर्मारंभ सदोष तसा ॥१८:४८॥

बुद्धि ज्याची असे अलिप्त । इंद्रिये जिंकिली समस्त ॥

असे जो कामनारहित । त्यास लाभे नैष्कर्म्य श्रेष्ठ ॥१८:४९॥

नैष्कर्म्यसिद्धि झाली ज्यास । प्राप्ति होय ब्रह्माचीही त्यास ॥

ब्रह्म हे असे ज्ञानाचे गंतव्य । ते मी सांगेन संक्षेपे, कौंतेय ॥१८:५०॥

जो असे अतिशुद्धबुद्धियुक्त । मन केले धैर्याने नियंत्रित ॥
समस्त त्यागिल्या वासना । नसे तिरस्कार वा कामना ॥१८:५१॥

राही एकांती आहार मित । कायावाचामन नियंत्रित ॥
असे सदैव मग्न ध्यानात । आणि दृढ वैराग्यभावात ॥१८:५२॥

बल, दर्प, अहंभावना । क्रोध, लोभ, कामवासना ॥
यांपासून जो झाला मुक्त । शांत, तो होई ब्रह्मीभूत ॥१८:५३॥

ब्रह्मस्वरूप आणि प्रसन्नचित्त । नसे शोक वा इच्छा किंचित ॥
जो समबुद्धि भूतांप्रती समस्त । माझी परम भक्ति त्यासी प्राप्त ॥१८:५४॥

माझी जो करी भक्ति । त्यासी होई ज्ञानप्राप्ति ॥
मज जाणोनी यथार्थ । मग तो येतसे मजप्रत ॥१८:५५॥

कर्मे अनेकानेक जरी करिती । परि माझे अनुसंधान राखिती ॥
त्यांसी होई माझी कृपा प्राप्त । मग मिळे त्यांस स्थान शाश्वत ॥१८:५६॥

कर्मे मजसी अर्पण । तू मनोभावे करून ॥
ठेव बुद्धि आणि मन । मजमाजीच तल्लीन ॥१८:५७॥
ठेवशील मजठायी चित्त । होईल माझी कृपा प्राप्त ॥
तरशील संकटातून सकल । अन्यथा तुझा नाश होईल ॥१८:५८॥
परि अहंकार धरोनी मनी । होसी परावृत्त युद्धापासूनी ॥
वृथा दुराग्रह व्यर्थ असेल । तुझा स्वभाव युद्ध करवील ॥१८:५९॥

क्षात्रस्वभाव करणे युद्ध । ज्याने पार्था, असशी बद्ध ॥
अनिच्छसी तू मोहाकारणे । तरी भाग तुजसी ते करणे ॥१८:६०॥

समस्त भूतांचे हृदयात । वसतसे ईश्वर, हे पार्थ ॥
माया त्यांस फिरवीत । जणू यंत्रावरी बसवीत ॥१८:६१॥

तू परमेश्वरा शरण जावे । हे पार्था, करून सर्वभावे ॥
त्याच्या कृपेने तुजसी प्राप्त । परमशांति व स्थिति शाश्वत ॥१८:६२॥

अशा प्रकारे अतिगुह्य ज्ञान । मी वर्णिले तुजसी, हे अर्जुन ॥
करावे उत्तम चिंतन व मनन । निर्णय करावा जसे तुझे मन ॥१८:६३॥

असती मला अतिप्रिय । ऐक पुन: तू ज्ञान गुह्य ॥
मी तुजसी सांगत असे । जे तुझ्या हिताचे असे ॥१८:६४॥

पार्था, तू माझा भक्त व्हावे । मजसी पूजावे नमस्कारावे ॥
मग होईन मी प्राप्त तुजसी । हे सत्यवचन तू प्रिय मजसी ॥१८:६५॥

त्यागूनी समस्त धर्मांसी। यावे शरण केवळ मजसी॥
मी करीन तुजसी पापमुक्त। न करावा तू शोक किंचित॥१८:६६॥

न तप भक्ति करीतसे। इच्छा ज्ञानाची नसे॥
जो तिरस्कारी मजसी। न सांगावे ज्ञान त्यासी॥१८:६७॥

सांगी भक्तांसी गुह्यज्ञान श्रेष्ठ। करील माझी भक्ति एकनिष्ठ॥
मग तो होईल संशयरहित। माझ्या परमस्थानास प्राप्त॥१८:६८॥

त्याच्याशिवाय नसे कोणी अन्य । जो करी कर्म जे मजसी असे प्रिय ॥
या जगती नसे कोणीही त्या सारखा । जो असेल मजसी अधिक प्रिय सखा ॥१८:६९॥

हा संवाद दोघांतील । जो कोणी अभ्यासील ॥
त्यासी ज्ञानयज्ञाचे फल । श्रीमद्भगवद्गीता देईल ॥१८:७०॥

असीम भक्ति असे भरली हृदयात । जो श्रवण करी गीतेचे असूयारहित ॥
होई मुक्त समस्त पापातून खचित । जाई शुभलोकी पुण्यकर्माने जे प्राप्त ॥१८:७१॥

मी तुज सांगितली ही जी गीता । ऐकिली का एकाग्र करूनी चित्ता ॥
अज्ञानातून मोह निपजला होता । तो झाला का नाहीसा, हे पार्था? ॥१८:७२॥

मग अर्जुन म्हणतसे श्रीकृष्णाला । तुझ्या कृपेने मोह माझा नष्टला ॥
स्मृति परत, मजसी शंकारहिता । जे तू उपदेशिले तसे करीन आता ॥१८:७३॥

रोमांचित संजय म्हणत । संवाद तो अति अद्भुत ॥
कृष्ण अर्जुन जे बोलिले । ते महाराज, मी ऐकिले ॥१८:७४॥

योगेश्वर कृष्णाने सांगितले । मी हे अतिगुह्य ज्ञान ऐकिले ॥
कृपा ही व्यासांची साक्षात । धृतराष्ट्रास कथिण्यानिमित्त ॥१८:७५॥

पुन: पुन्हा मी असे आठवीत । हे राजन्, तो संवाद अद्भुत ॥
केशवार्जुनातील अतिपवित्र । अन् मजसी होतसे हर्ष मात्र ॥१८:७६॥

आणि मजला पुन: पुन्हा स्मरते । अति अद्भुत विश्वरूप हरीचे ते ॥
मजला वाटते आश्चर्य विलक्षण । होतो हर्ष पुन: पुन्हा, हे राजन् ॥१८:७७॥

जेथे असे श्रीकृष्ण योगेश्वर। आणि जेथे अर्जुनही धनुर्धर॥
लक्ष्मी, विजय, वैभव नांदती। नीतिमत्ता तेथे निश्चित असती॥१८:७८॥

**श्रीमद्भगवद्गीता समाप्त**

॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥

मोबाईल, कंप्युटर, इंटरनेट, फ़ेसबुक, व्हॉट्स-अप, आणि एकूणच नवीन तंत्रज्ञानात दोष दाखवणे अगदी सहज सोपे आहे. पण ते नवीन तंत्रज्ञान टाळणे केवळ कठीणच नव्हे तर अशक्यच झाले आहे. मग त्यांचा सदुपयोग का करू नये?

एकदा ईसाहित्य ला भेट द्या.

www.esahity.com

esahity@gmail.com

एक प्रसन्न अनुभव